# विजयाची माळ कोणाच्या गळ्यात?

## ■ विधानसभानिहाय टक्केवारीत घट; बारणेंना फटका

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**खासदार श्रीरंग बारणे यांच्या पारड्यात २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भरभरून मते टाकणाऱ्या मावळ लोकसभा मतदार संघातील विधानसभा क्षेत्रात यंदा मतांचा टक्का घसरला आहे. तर मागील निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूक लढलेल्या पार्थ पवार यांच्या पारड्यात जास्तीत जास्त मतांचे दान टाकणाऱ्या कर्जत आणि उरण मतदार संघात इतर मतदार संघापेक्षा जास्त प्रमाणात मतदान झाल्याने विधानसभा निहाय टक्केवारीमुळे उमेदवारांची धडधड वाढणार आहे.**

२०१९ साली पार पडलेल्या निवडणुकीत मावळ लोकसभा निवडणुकीत ५९ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. यंदा या अकड्यात घट झाली असून केवळ ५२ टक्केच मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. मतदानाच्या आकडेवारीत झालेल्या घटाचा परिणाम उमेदवारांच्या मटताधिक्यावर पडणार असल्याने कमी झालेली मतांची आकडेवारी कोणत्या उमेदवाराच्या गळ्यात विजयाची माळ घालणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

२०१९ साली बारणे यांना मताधिक्य देणाऱ्या विधानसभा मतदार संघातील मतदानाच्या टक्केवारीत यंदा कमालीची घट झाल्याचे पाहायला मिळत आहे. २०१९ सालच्या लोकसभेला चिंचवड विधानसभा मतदार संघात ५६.९१ टक्के मतदान झाले होते. बारणे यांना सर्वाधिक ९६ हजार मतांची आघाडी देणाऱ्या या मतदार संघातील मतदानात यंदा घट झाली असून,४९.४३ टक्के मतदारांनीच आपला मतदानाचा हक्क बाजवला आहे. तर बारणे यांना दुसऱ्या क्रमांकांची ५४ हजाराची आघाडी देणाऱ्या पनवेल मतदार संघात देखील मतांच्या टक्केवारीत घट होऊन ५३.३३ वरून ही आकडेवारी ४९.२१ टक्क्यावर आली आहे. त्याचप्रमाणे बारणे यांना मताधिक्य देणाऱ्या विधानसभा मतदार संघात २०१९ साली अनुक्रमे ६२.६० टक्के मतदान झालेल्या मावळ लोकसभा मतदार संघात यंदा मतदानाच्या टक्केवारीत कमालीची घट झाल्याचे पाहायला मिळाले आहे. यंदा या मतदार संघात केवळ ५३.०२ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. तर, पिंपरी विधानसभा मतदार संघात मागील वेळी ५४.६६ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असताना यंदा हा आकडा ४८.२५ टाक्यावर आला आहे.



### शेकापची भूमिका महत्त्वाची

**महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शेतकरी कामगार पक्षाने यंदाची निवडणूक महत्वाची केली होती. शेकाप तसेच कॉंग्रेस पक्षाकडून विशेषत: उरण विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडी करता मोठ्या प्रमाणात प्रयत्न केल्याने येथील दोन्ही पक्षाची भूमिका महाविकास आघाडीसाठी सोयीची ठरण्याची शक्यता आहे.**

### पनवेल मताधिक्य घटण्याची शक्यता

**मतदार संघात बारणे यांच्यावर असलेली नाराजी वाघेरेच्या पथ्याशी पडण्याची शक्यता असून, पनवेल विधानसभा मतदार संघात कमी झालेल्या मतदानाच्या टक्केवारीमुळे बारणे यांच्या मताधिक्यात कमालीची घट होण्याची शक्यता जाणकार व्यक्त करत आहेत.**

# तुंगीमध्ये मतदारांचा उत्साह

### हजार फुटांचा डोंगर चढून मतदान



**। नेरळ । वार्ताहर ।**

मावळ लोकसभा मतदासंघासाठी सोमवारी (दि.१३) निवडणूक प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत ३३ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. तर, यासाठी कर्जत तालुक्यातील दुर्गम भाग असलेल्या समुद्रसपाटीपासून १ हजार फूट उंच अशा तुंगी गावात देखील नागरिकांनी मतदान केले. महत्वाची बाब म्हणजे एवढा डोंगर चढून नागरिकांनी मतदान केले.

कर्जत तालुक्यात डोंगर दुर्गम भाग मोठ्या प्रमाणात आहे. तर तालुक्यात सह्याद्रीच्या पर्वत रांगेत समुद्रसपाटीपासून एक हजार फूट उंचावर तुंगी हे गाव वसलेले आहे. या गावात ३५५ मतदार आहेत. मात्र, गाव उंचीवर असल्याने गावाला अनेक वर्ष रस्ता नव्हता. आता रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. परिणामी पोटापाण्यासाठी येथील बहुतांश नागरिक हे नेरळ, कशेळे कर्जत अशा भागात वास्तव्यास आहेत. मात्र, त्यांचे मतदान हे तुंगी गावातच आहे. त्यामुळे मतदानासाठी अनेक नागरिक हे डोंगर चढून गावात दाखल झाले व त्यांनी उत्साहाने मतदान केले असल्याचे चित्र होते.

## वे|ध|क

### अदखलपात्र गुन्हा दाखल

**। पनवेल । वार्ताहर ।**

मतदानासाठी रांगेत उभे असताना अमुक-अमुक उमेदवाराला मतदान करू नका, असे बोलत असताना एका व्यक्तीने याची तक्रार केल्यानंतर एका विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात अदखलपत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार ईलाईट स्कूल तळोजा फेस वन या ठिकाणी मतदार मतदान करण्यासाठी रांगेत उभे असताना हा प्रकार घडला. यावेळी अमुक एका उमेदवाराला मतदान करू नका, असे एक इसम सांगत होता. याबाबतची तक्रार एका व्यक्तीने पोलिसांकडे केली. त्यानंतर तळोजा पोलिसांनी या इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात अदखलपत्र गुन्हा दाखल केला.

### पोलीस पाटलांचा सन्मान सज्ज

**। पाली । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीत पोलिसांबरोबर पोलीस पाटलांनी देखील उत्तम कामगिरी बजावल्याबद्दल पाली पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांनी सुधागड तालुक्यातील पोलीस पाटलांना गुलाबाचे पुष्प देऊन त्यांचे अभिनंदन केले. रायगड लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम दि.७ मे रोजी पार पडला. पेण-सुधागड मतदार संघात मतदान अत्यंत शांततेत पार पडले. रायगड लोकसभा या मतदार संघात अंदाजे ६० टक्क्यापर्यंत मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या निवडणूक प्रक्रियेत सुधागड तालुक्यातील पोलीस पाटलांनी पोलिसांबरोबरच आपले कर्तव्य बजावून मोलाचे सहकार्य केले. याबाबत पाली पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांनी सुधागड तालुक्यातील सर्व पोलीस पाटील यांना पाली पोलीस ठाण्यात गुलाब पुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले. तसेच, निवडणूक प्रक्रियेत व्यवस्थापक म्हणून मोलाचे सहकार्य केल्याबद्दल आभार ही मानले. जनार्दन कासार व अतिरिक्त सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा उरणचे तहसिलदार डॉ.उद्धव कदम यांनी व्यक्त केला आहे.



मुरूड परिसरात कडक उन्हात डबक्यात थंडा थंडा कुल होताना म्हशी टिपल्यात. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# महाराष्ट्र अंनिसची निर्धार सभा

**। पनवेल । वार्ताहर ।**



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या खूनाला अकरा वर्षे होत आलेली असताना त्यांच्या खटल्याचा निकाल आला. मात्र, त्या निकालाने सर्वच संवेदनशील नागरिक निराश झाले. प्रत्यक्ष मारेकरी असलेले सचिन अंदुरे, शरद कळसकर यांना जन्मठेपेची शिक्षा झाली तर विरेंद्रसिंह तावडे, संजीव पुनाळेकर, विक्रम भावे यांची निर्दोष मुक्तता झाली आहे. मारेकऱ्यांना शिक्षा झाली याचे समाधान व्यक्त होत असतानाच सूत्रधार मोकळे राहिले याची खंतही व्यक्त केली जात आहे. ही खंत व्यक्त करणारी निर्धार सभा महा. अंनिस पनवेल शाखेने आयोजित केली होती. या सभेस प्रमुख उपस्थिती महा. अंनिस राज्य उपाध्यक्ष डॉ. प्रदीप पाटकर, ॲड. तृप्ती पाटील यांची लाभली.

सुरुवातीस महेंद्र नाईक, प्रशांत ननावरे, रोहिदास कवळे, तनुश्री खातू, नाजुका सावंत, पूजा डांबरे यांनी निषेध व निर्धारपर मनोगत व्यक्त केले. ॲड. तृप्ती पाटील यांनी कायद्याचे धोडक्यात विश्लेषण केले. निकालातील समाधानकारक गोष्टी तसेच न्यायालयाने तपासयंत्रणेवर कोणत्या गोष्टींवर ताशेरे ओढले हे स्पष्ट केले.

# मोबाईलला नेटवर्क नसल्याने गैरसोय

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्याच्या पूर्व भागात चिरनेर, कळंबुसरेसह अनेक गावांचा समावेश आहे. या गावांमध्ये आयडीया, एअरटेल, जिओ कार्डचे अनेक ग्राहक आहेत. मात्र, या ग्राहकांना मोबाईल कंपनीचे नेटवर्क मिळत नसल्याने मोबाईल धारक नागरीक हैराण झाले आहेत. उरण पूर्व भाग हा ग्रामीण भाग म्हणून ओळखला जातो. मात्र, याच ग्रामीण भागात अनेक उच्च शिक्षित नागरिक, विद्यार्थी वास्तव्य करीत आहेत. सध्या या भागात मोठ्या प्रमाणात उद्योग-धंदे निर्माण होत असल्याने कामगार वर्गाची वस्ती वाढत आहे. या मधिल अनेक नागरीक, कामगारांकडे आयडीया, जिओ, एयरटेल कंपन्यांचे मोबाईल कार्ड आहेत. तसेच, ग्रामीण भागातील सर्व सामान्य नागरिकही या फोन कार्डचा वापर करीत आहेत. मात्र, अनेक वेळा इमर्जन्सी असतानाही फोन, मोबाईल लागत नाही. तसेच, आयडीया, एअरटेल जिओ मोबाईल फोनला नेटवर्क कमी प्रमाणात मिळत आहे. लाईट गेल्यानंतर तर संपूर्ण नेटवर्कच गायब असते. यामुळे मोबाईल धारक ग्राहकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# हायस्कूलला दिल्ली बोर्डाची मान्यता



**। पेण । प्रतिनिधी ।**

रविशेठ पाटील एज्युकेशन सोसायचीच्या ट्री हाऊस हायस्कूलला दिल्ली बोर्डाची मान्यता मिळाली आहे. शाळा पहिली ते दहावीपर्यंत असून दिल्ली बोर्डाने सी.बी.एस.ई. संलग्नता देऊन दिल्ली बोर्डाकडून मान्यता मिळाली आहे.

हे ट्री हाऊस स्कूल २०१६ साली सुरू झाले. महाराष्ट्र शासनाची परवानगी घेऊन ट्री हाऊस शाळा सुरू करण्यात आली होती. आता दिल्ली बोर्डाकडून मान्यता देण्यात आली आहे. महत्वाची बाब म्हणजे पेण शहरामध्ये सी.बी.एस.ई बोर्डाची मान्यता प्राप्त मिळाल्याने भविष्यात याचा फायदा पेण तालुक्यातील विद्यार्थ्यांना मोठयाप्रमाणात होणार आहे. त्यातच या शाळेची ईमारत ही निसर्गरम्य ठिकाणी असल्यामुळे विद्यार्थ्यांना गर्दीचा अथवा गोंधळाचा त्रास होत नसल्याने कळत नकळत विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढून त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत होत आहे.

यावेळी कृषीवलच्या प्रतिनिधीशी बोलताना रविशेठ पाटील एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा शर्मिला पाटील यांनी सांगितले की, पेण हे विद्येचे खरे माहेरघर आहे. म्हणूनच लोकमान्य टिळकांनी पेणला कोकणातील पुणे संबोधले होते. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्याच्या दृष्टीने ट्री हाउस हायस्कूलला दिल्ली बोर्डाची मान्यता आणली आहे.



# पाऊस थांबल्यानंतर मतदारांचा उत्साह कायम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा मतदारसंघासाठी काल मतदान पार पडले. त्यात कर्जत विधानसभा मतदारसंघात ६१.४० टक्के मतदान झाले आहे. कर्जत तालुक्यात मतदानाच्या दिवशी अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसात मतदारांना मतदान केंद्रावर जाण्यासाठी अडचणी आल्या आणि त्यामुळे कर्जत तालुक्यात फेरमतदान घेण्याची मागणी महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी निवडणूक आयोगाकडे पत्र पाठवून केली आहे. तर, याच भागात मतदानाची वेळ वाढवून देण्याची मागणी देखील केली होती.

मावळ लोकसभा मतदारसंघात १३ मे रोजी मतदान पार पडले. मतदान सुरू असताना दुपारी वादळी वाऱ्यासह पाऊस आला. कर्जत तालुक्याच्या प्रत्येक भागात अवकाळी पावसाने साधारण दीड ते दोन तास जोरदार पर्जन्य वृष्टी केली. काही भागात गारांचा पाऊस देखील झाला आणि त्यामुळे कळंब, कशेले, नांदगाव, खांडस भागात दुपारी दोन ते चार तर तर नेरळ डिकसळ कडाव भागात अडीच ते चार आणि कर्जतमध्ये साडे तीन ते पाच या वेळेत अवकाळी पाऊस सुरू होता.

### बारणेंकडून फेर मतदानाची मागणी

दुपारी उन्हाचा तडाखा वाढणार असल्याने मतदारांनी संध्याकाळचा पर्याय निवडला होता. मात्र, दुपारी सुरू झालेल्या अवकाळी पावसामुळे मतदारांना मतदान केंद्रावर जाण्यास अडथळे निर्माण झाले. त्यामुळे मतदानाची वेळ वाढवून देण्यात यावी, अशी मागणी करणारे पत्र निवडणूक आयोगाला पाठवले. त्यांनी आपल्या पत्रामध्ये कर्जत तालुक्यात वादळी पाऊस झाल्याने अनेक ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाला आहे, मतदान केंद्रावर अंधार पसरला आहे आणि मतदान करण्यासाठी मतदान हा घरातून बाहेर पडू शकत नाही. अशा वेळी मतदानाची वेळ वाढवून देण्याची मागणी आयोगाने मान्य केली नव्हती. मात्र पाऊस सुरू असताना देखील मतदान सुरू होते आणि त्यामुळे महायुतीचे उमेदवार यांची फेर मतदान घेण्याची मागणी मान्य होण्याची शक्यता कमी आहे.

मतदानाची टक्केवारी साधारण अपेक्षित असल्याने संजोग वाघेरे आणि बारणे यांच्यात मावळ लोकसभेसाठी प्रचंड चुरस कर्जत विधानसभा मतदारसंघात दिसून येत आहे.

# पाच पिढ्यानंतर भोईर फौजदार एकत्र

**। कोलाड । वार्ताहर ।**



रोहा तालुक्यातील देवकान्हे गावात भोईर फौजदार कुटुंब गेली अनेक दशके वास्तव्य करत आहेत. कामानिमित्त परगावी जाणारी भावकी जरी वास्तव्यास बाहेर राहिले असले तरी त्यांची घरे मात्र गावात आहेत. दिवसेंदिवस एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होत चालला आहे. असे जरी असले तरी आपले कुटुंब एकत्र असावे अशी भावना मनात येते. प्रत्येक जण मोबाईलमुळे एका मिनिटात एकमेकांजवळ बोलत असला तरी एकत्र येऊन सहभोजन करून आपल्या सुखदुःखाची आदान प्रदान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे झाली पाहिजे ही भावना भोईर फौजदार भावकीला सुचली व तब्बल पाच पिढ्यानंतर देवकान्हे भोईर फौजदार भावकी एकत्र आली. एकीच्या भावनेने भोईर फौजदार भावुक झाल्याचे दिसले. वयोवृद्ध, सेवानिवृत्त झालेल्या पिढीला आनंदअश्रू अनावर झाले. एकत्रित कुटुंबाची भावना ठेवणारी भोईर फौजदार भावकी समजापुढे आदर्श देणारी आहे, असे आता तालुक्यात बोलले जात आहे.

देवकान्हे गावातील भोईर फौजदार भावकीचे कुटुंब प्रमुख स्व. कानू कृष्णा भोईर व स्व. भागीरथी कानू भोईर यांची मुले रामजी, आंबाजी, नामदेव, जानू, देवजी, हिराजी आणि कुशीबाई यांची मुले, सुना, मुली, जावई नातवंडे यांच्या स्नेहमेळाव्याचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य शंकर जानू भोईर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. कार्यक्रमापूर्वी कुटुंबातील मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रतिमा वैभव भोईर यांनी आपल्या प्रस्तावनेत सांगितले कि, कुटुंबाशिवाय आयुष्य अपूर्ण आहे. तसेच, आपण कुटुंबाचे नेहमीच ऋणी राहिले पाहिजे असे सांगितले.

### देशपांडे लिखित पुस्तके प्रकाशित

**मुंबई :** ग्रंथालीने प्रकाशित केलेली अ.पां. देशपांडेलिखित 'महाराष्ट्राची तीन लाडकी व्यक्तिमत्त्वे' (आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे आणि पं. भीम सेन जोशी) आणि 'कृतार्थ मी कृतज्ञ मी...' (आत्मचरित्र) या पुस्तकांचे प्रकाशन अनुक्रमे दनकर गांगल, माजी विश्वस्त ग्रंथाली आणि अचला जोशी, ख्यातनाम उद्योजिका यांच्या हस्ते झाले. शनिवारी (दि.११) मराठी विज्ञान परिषदेत झालेल्या या कार्यक्रमाला सुमारे ७५ व्यक्ती उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि मान्यवरांचा परिचय श्रीमती अश्विनी भोईर यांनी करून दिला.

# शिवस्मारकाचे लोकार्पण

**। राबगाव/पाली । वार्ताहर ।**



राबगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवस्मारकाचा लोकार्पण सोहळा गावातील ज्येष्ठ नागरिक, तरुण मित्र मंडळ ठाणे, पुणे, मुंबई आदिसह महिला वर्गाच्या विशेष उपस्थितीत रविवारी मोठ्या जल्लोषात संपन्न झाला. या सोहळ्यानिमित्त सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेसह शिवज्योत घेऊन गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल ताशाच्या गजरात तसेच फटाक्यांच्या आतिषबाजीत निघालेल्या मिरवणुकीचे गावातील नागरिकांनी घरोघरी औक्षण करून स्वागत केले. यावेळी गावातील तरुणीने लाटीकाटी तलवारबाजीसह शिवकालीन प्रात्यक्षिके करून गावातील ग्रामस्थांची मने जिंकली. संपूर्ण गावातून ही भव्य मिरवणूक फिरून आल्यानंतर शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थितीत भव्य दिव्य अशा स्वरूपात बनविण्यात आलेल्या शिवस्मारकाचे लोकार्पण भक्तीमय वातावरणात करण्यात आले.

### मंदिराचा वर्धापनदिन साजरा

**चौक :** चौक परिसरातील जे. एम. म्हात्रे चॅरिटेबलं ट्रस्टचे नढाळ येथील श्री क्षेत्र पंचायतन मंदिर हे अतिशय प्रसिद्ध, नावाजलेलं आणि पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. याठिकाणी दररोज असंख्य लोकं भेट देत असतात. अशा या प्रसिद्ध पंचायतन मंदिराचा दुसरा वर्धापनदिन सोहळा सोमवारी (दि.१३) पार पडला. यानिमित्त विविध धार्मिक कार्यांचे आयोजन ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम म्हात्रे यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते. मंदिरात पहाटे काकड आरती व सर्व देवीदेवतांचे अभिषेक, पूजन, दुपारी भजन, सायंकाळी पालखी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यानंतर लांबे महाराज यांचे कीर्तन झाले.

# सीबीएसई दहावीमध्ये निरज सरसंबे प्रथम

***। कोलाड । वार्ताहर ।***

***२०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षातील सीबीएसई दहावी व बारावी विज्ञान, वाणिज्य शाखेचा निकाल सोमवारी जाहीर झाला असून रोहा तालुक्यातील जे.एम.राठी इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज या शाळेचा निकाल चांगला लागला आहे. जे.एम.राठी इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजने यशाची परंपरा कायम ठेवली आहे.***



*रोहा तालुक्यातील जे.एम. राठी इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थी निरज महादेव सरसंबे याने ९८.२० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर द्वितीय क्रमांक सिया संदीप सरफळे ९६.८० टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे. या शाळेत तृतीय क्रमांक अनुष्का सतीश पवार ९४.८० टक्के, चतुर्थ क्रमांक आनंद संदीप जाधव ९३.२० टक्के, पाचवा क्रमांक अभिनव धनंजय गुरव ९२.४० टक्के गुण याने गुण मिळवून यश संपादन केले आहे.*

*बारावी विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक अंशु दिपक माने ९१.२० टक्के, द्वितीय क्रमांक जीवन टॉम जाकॉब ८७.८० टक्के, तृतीय क्रमांक जान्हवी अनिल निपाणे ८५.८० टक्के, चतुर्थ क्रमांक प्रथमेश बाळासाहेब गायकवाड ८५.४० टक्के, पाचवा क्रमांक जान्हवी राजेश थोरे ८४.२० टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे.*

*बारावी वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक हर्ष किशोर तावडे ८७.८० टक्के, द्वितीय क्रमांक मनील मनोज बोराणा ७६.२० टक्के, तृतीय क्रमांक शृंगार राजेश मौर्या ७३.८० टक्के व गौरव सुरेश बोराणा ७३.८० टक्के, चतुर्थ क्रमांक शुभ निलेश गुप्ता ६७ टक्के, पाचवा क्रमांक अर्थव अजय तावडे ६०.४० टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे.*

*या यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक लीना डेव्हिड, उपमुख्याध्यापक दिपक माने यासह शाळेतील शिक्षक पालक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.*

# सर्वात स्वस्त गोष्ट

'मरे एक त्याचा दुजा शोक वाहे, अकस्मात तोही पुढे जात आहे,' असे रामदासस्वामींनी म्हटले आहे. सध्याच्या भारतातल्या स्थितीला हे अचूक लागू पडणारे वर्णन आहे. एखाद्याच्या मरणाबद्दल शोक करणाराच एकाएकी निजधामास जात असल्याचे चित्र हरघडी पाहायला मिळते. भारतातील सर्वात स्वस्त गोष्ट म्हणजे इथल्या नागरिकांचे मरण. इथे हजारो माणसे रोज अचानक मरतात. आजारपणाने वा वृध्दापकाळाने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या वेगळी. पण लोकांच्या चुकीमुळे, सरकारच्या बेपर्वाईमुळे जे हकनाक बळी जातात त्यांची गणतीच नाही. १४० कोटींचा देश आहे. लोकसंख्या सतत वाढतच आहे. त्यामुळे या मरणाऱ्यांबद्दल थोडा काळ शोक होतो. पण नंतर असे प्रकार सर्व जण लगेचच विसरून जातात. मुंबईत सोमवारी होर्डिंग पडून चौदा लोकांचे गेलेले बळी हा यातलाच एक प्रकार ठरण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या वादळी पावसामुळे घाटकोपरमध्ये हे होर्डिंग कोसळले आणि अनेक कुटुंबांचे होत्याचे नव्हते झाले. नेहमी अशा बातम्यांमध्ये मरण पावलेल्यांच्या कुटुंबियांना सर्वाधिक सहानुभूती मिळते. ते रास्तही आहे. पण अशा प्रसंगांमध्ये जखमी होणाऱ्यांचे हाल अनेकदा मरणाहूनही भयंकर ठरू शकतात. जिवावरचे बोटावर निभावले असे म्हणणे सोपे असते. पण ज्यांचा कायमचा हात-पाय जातो त्यांचे वा त्यांच्या कुटुंबियांचे आयुष्यच अशा अपघातांमुळे बदलून जात असते. शिवाय, या घटनेमध्ये त्यांचा कोणताही दोष नसतो. सोमवारच्या घटनेत अनेक जण सीएनजी भरण्यासाठी पंपावर आले होते. तर काही जण पावसापासून वाचण्यासाठी आडोशाला थांबले होते. पण काही लोकांची बेपर्वाई या निरपराधांच्या जिवावर बेतली. त्याची किंमत त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आयुष्यभरासाठी भरावी लागणार आहे. ज्या कुटुंबातील कर्त्या व्यक्ती गेल्या त्यांचा आधारच तुटला. जे जखमी झाले त्यांचे उपचार, सततच्या इस्पितळ वाऱ्या आणि खर्च हे त्यांच्या कुटुंबियांच्या मागे लागणार आहे. यात होणारे दुःख व मनस्ताप वेगळा.

### तात्काळ शिक्षा हवी

हे होर्डिंग बेकायदेशीरपणे लावण्यात आले होते असे आता निष्पन्न झाले आहे. महापालिकेतर्फे चाळीस बाय चाळीसच्या होर्डिंग्जना परवानगी असताना हे होर्डिंग त्यांच्या तिप्पट आकाराचे होते. मुंबई महापालिकेने आता या होर्डिंग लावणाऱ्या एजन्सीला तिचे या परिसरातले सर्व होर्डिंग्ज काढून टाकायला सांगितले आहे. तसेच अपघातकारक होर्डिंग बेकायदा असल्याबद्दल आधीच तक्रारी झाल्या होत्या व एजन्सीला नोटिसा दिल्या गेल्या होत्या असेही काही बातम्यांमध्ये म्हटले आहे. मात्र १२० बाय १२० इतक्या प्रचंड आकाराचे होर्डिंग उभे राहत असताना पालिकेचे अधिकारी, स्थानिक नगरसेवक व राजकीय पक्षांचे लोक काय करीत होते असा खरा प्रश्न आहे. हा भाग भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. दूर कुठेतरी कोणीतरी राम नाहीतर हनुमानाविषयी अवमानकारक बोलले अशी नुसती अफवा पसरली तरी या पक्षाचे शेकडो कार्यकर्ते लगेच रस्त्यावर येऊन ओरडा करायला सुरूवात करतात. मात्र लोकांच्या जिवाला अपाय करणारी अशी होर्डिंग असोत की रस्त्यावरचे खड्डे, याबद्दल मात्र या पक्षाचे हे जागृत कार्यकर्ते ब्र देखील उच्चारत नाहीत. आता सध्या निवडणुकीचा हंगाम सुरू आहे. येत्या सोमवारी मुंबईत निवडणुका आहेत. त्यामुळे आता हे होर्डिंग लावणाऱ्याशी कोणाचे राजकीय संबंध आहेत वा तो कोणाला पैसे देतो यावरून बरेच आरोप-प्रत्यारोप होण्याची शक्यता आहे. मात्र हा प्रकार अत्यंत लाजिरवाणा असेल. कारण असे कंत्राटदार आणि धंदेवाले यांचे सर्वच पक्षांशी संबंध असतात व सत्तेत कोणीही आला तरी ते आपला मतलब बरोबर साधून घेतात हे अनेकदा दिसून आले आहे. त्यामुळे आता पक्षीय राजकारण न करता या कंत्राटदाराला कठोर शिक्षा झाली पाहिजे. सर्वात महत्वाचे हे असेल की त्याच्याविरुध्दचा तपास व खटला न रेंगाळता तात्काळ निकालात निघाला पाहिजे. तरच या दुर्घटनेतील बळींना न्याय मिळेल व असे प्रकार करणाऱ्यांना जरब बसेल.

### नियंत्रण कोण ठेवणार?

मुंबईतले आयुष्य कायमच बेभरवशाचे होते. सध्या ठिकठिकाणी चालू असलेल्या मेट्रो, भुयारी मार्ग, उड्डाणपूल, समुद्री मार्ग आणि नव्या इमारतींच्या कामांमुळे मुंबईतील वाहतूक व्यवस्थेचे तीन तेरा वाजलेले आहेत. यंदा थंडीमध्ये तेथे धुळीचे प्रमाण इतके प्रचंड होते की प्रदूषण नियंत्रण मंडळाने यापैकी बरीच बांधकामे थांबवण्याचे आदेश दिले. या बांधकामांदरम्यान सुरक्षा नियम व कायद्यांचे पालन होते आहे की नाही यावर देखरेख ठेवणारी कोणतीही यंत्रणा सरकारपाशी नाही. त्यामुळे शहरात सर्वत्र प्रचंड अंदाधुंद बांधकामे व बेकायदा गोष्टी उभ्या राहत असतात. काल अचानक वादळी वारा आल्याने घाटकोपरमधील हे होर्डिंग तसेच वडाळ्यातील एक बांधकाम कोसळले. पण अशी अनेक होर्डिंग्ज व बांधकामे शहरात धोकादायक स्थितीत जागोजागी उभी आहेत. अशा दुर्घटना झाल्यावर सरकार नेहमी करते त्याप्रमाणे होर्डिंग्जचे सुरक्षा ऑडिटची घोषणा झाली आहे. एखाद्या रुग्णालयाला आग लागली की सर्वांचे फायर ऑडिट करणार अशी घोषणा होते. इमारत कोसळली की बांधकामांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे जाहीर होते. या घोषणांचे पुढे काय होते हे कोणालाच कळत नाही. दुसऱ्या अशाच दुर्घटनेपर्यंत सर्वच जण झोपी जातात. प्रशासनावर मंत्री इत्यादींचा वचक हवा, सरकारवर विरोधकांचा वचक हवा आणि या सर्वांवर जनतेचा वचक हवा, ही खरी लोकशाहीची आदर्श स्थिती आहे. पण आपल्याकडे कोणाचाच कोणावर वचक नाही. उलट ज्यांच्या हाती सत्ता त्यांच्यापुढे सर्व जण शरणागत झालेले दिसतात. मागे मुंबईतील पावसात गटाराचे झाकण उघडे राहिल्याने जागतिक कीर्तीचे यकृततज्ज्ञ त्यात पडून मरण पावले होते. दुसरीकडे गटार सफाईसाठी उतरणाऱ्या कर्मचाऱ्यांना पुरेशी सुरक्षा नसल्याने त्यांच्या मृत्यूच्या घटना अधूनमधून होत असतात. एक समाज म्हणून आपण खरोखरच प्रगती करीत आहोत का याचा विचार करायला लावणाऱ्या या घटना आहेत. आपल्या निवडणुकांच्या प्रचारात अशा प्रश्नांची गंभीर चर्चा अपेक्षित आहे. शिव्यांची गटारगंगा वाहणे नव्हे.

विचार

# संघर्षपूर्ण राजकारणाची शक्यता

**निवडणुकीच्या काळात विविध राजकीय पक्ष आपली ध्येयधोरणे जाहिरनाम्यांमध्ये स्पष्ट करत असले तरी निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाल्यानंतर यातील बहुसंख्य मुद्दे मागे पडताना दिसतात. सार्वत्रिक निवडणुकांचा महत्त्वपूर्ण टप्पा पार पडत असताना याची प्रचिती देशातील जनतेला येत आहे. मात्र यापुढील सभांमध्ये नेत्यांची भाषणे अधिक तीव्र, टोकदार आणि स्फोटक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.**



**डॉ. अशोक चौसाळकर**

लोकसभा निवडणुकीला सुरूवात होऊन जवळपास निम्मा काळ लोटला आहे. सुरुवातीच्या टप्प्यांमध्ये २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत मतदान दोन ते तीन टक्क्यांनी कमी झाले आहे. यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे या वर्षी उन्हाळा अत्यंत तीव्र असून पहिल्या दोन टप्प्यांमध्ये लोकांना आकर्षित करणारे फारसे मुद्दे मांडण्यात आले नव्हते. परंतु आता प्रचार मोहीम भरात आली असून दोन प्रमुख आघाड्यांचे नेते एकमेकांवर तीव्र आरोप-प्रत्यारोप करत आहेत. त्यामुळे पंतप्रधान मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या सभांना लोकांची मोठी गर्दी होत आहे. भारतीय जनता पक्षाची प्रचार मोहीम मुख्यतः पंतप्रधानांच्या शीरावर आहे. २०१९ मध्ये मोदींबरोबर सुषमा स्वराज, अरुण जोटली, राजनाथ सिंग आदी नेतेही प्रचार मोहिमेत सक्रिय होते. आता तसे चित्र दिसत नाही. राज्य पातळीवर प्रचाराची धुरा भाजपाचे स्थानिक नेते सांभाळत आहेत. 'इंडिया' आघाडीच्या प्रचार मोहिमेत मुख्यतः राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि प्रियांका गांधी हे मुख्य चेहरे आहेत. वेगवेगळ्या राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांचे नेते प्रचार मोहिमेचे नेतृत्व करत आहेत.

भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी आपापल्या जाहीरनाम्यात त्यांना कोणत्या प्रश्नांच्या आधारे पुढील राजकारण करायचे आहे, याची मांडणी केली. भारतीय जनता पक्षाचा जाहीरनामा मुख्यतः चार बाबींवर भर देतो. त्यातील एक म्हणजे गेल्या दहा वर्षांमधील मोदी सरकारची आर्थिक कामगिरी आणि २०२९ पर्यंत भारताला जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवणे हे मुद्दे. दुसरा मुद्दा विविध समाजांमधील वेगवेगळ्या वंचित आणि मागास घटकांसाठी अनेक प्रकारच्या कल्याणकारी योजना राबवणे हा आहे. त्यामध्ये 'प्रधानमंत्री गृह योजना' आणि 'घर तेथे नळ' ही योजना महत्त्वाची आहे. त्यांनी मांडलेला तिसरा मुद्दा म्हणजे भारतीय राष्ट्रवादाची मांडणी करत असताना सांस्कृतिक राष्ट्रवादाची भूमिका अधोरेखित करणे. त्यासाठी रामजन्मभूमी मंदिर, ३७० कलम रद्द करणे ही दोन आश्वासने भाजप सरकारने पूर्ण केली असून समान नागरी कायदा करण्याच्या दृष्टीने पुढील काळात पावले टाकली जातील, या आश्वासनाचाही समावेश आहे. त्या दृष्टीने त्यांनी एकात्म भारतीय राष्ट्रवादाची कल्पना मांडली आहे. चौथा मुद्दा आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताला मोठी प्रतिष्ठा मिळण्याचा आहे. शत्रूंवर एक प्रकारचा वचक निर्माण करण्यात देशाला यश लाभले आहे. परराष्ट्र धोरण आणि संरक्षण धोरणात शस्त्रास्त्र निर्मितीबाबतीत जास्तीत जास्त स्वावलंबन आणणे हे त्यांच्यापुढील ध्येय आहे. थोडक्यात, भाजपाच्या जाहीरनाम्यातील मुख्य दोन मुद्दे म्हणजे विकसित भारत आणि 'सबका साथ, सबका विकास' हे दिसून आले आहे.

काँग्रेसच्या जाहीरनाम्यामध्ये सामाजिक न्यायाचा मुद्दा प्रकर्षाने पुढे आला आहे. आपल्या जाहीरनाम्यात काँग्रेसने समाजात पाच प्रकारचे न्याय प्रस्थापित करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या जाहीरनाम्यातील चार महत्त्वाचे मुद्दे म्हणजे समाजातील विषमता दूर करुन न्यायाच्या आधारावर समाजाची फेरमांडणी करणे आणि त्या दृष्टीने योग्य ती धोरणे आखणे. दुसरा मुद्दा सामाजिक न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी देशभर जातनिहाय जनगणना करणे आणि प्रत्येक जातीच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचा विचार करुन त्यानुसार राज्यांची धोरणे आखणे. तिसरा मुद्दा म्हणजे भारतीय जनता पक्ष बेरोजगारीची समस्या सोडवू शकलेला नाही; त्या पक्षाचे सरकार मक्तेदार भांडवलदारांना, मुठभर उद्योगपतींना सूट देत असून सरकारी मालकीचे उद्योग विक्रीला काढत आहे हा आक्षेप. या धोरणामुळे देशात बेरोजगारी वाढत आहे हा महत्वाचा मुद्दा आहे तर चौथा मुद्दा काँग्रेसची राष्ट्रवादाची भूमिका सर्वसमावेश असल्याचा आहे. भारत हा सर्वधर्मियांचा देश असून या देशातील अल्पसंख्याकांना घटनेने दिलेले अधिकार उपभोगण्याचा पूर्ण अधिकार आहे. दरम्यान, मोदी यांच्या काळात केंद्र-राज्य संबंधांमध्ये असमतोल निर्माण झाला आहे आणि राज्यांचे अधिकार कमी होत आहेत. हा समतोल पुन्हा स्थापन करण्याची हमी काँग्रेसने दिली आहे.

असे असले तरी निवडणूक जाहीरनाम्यांमध्ये मांडलेल्या मुद्द्यांप्रमाणेच प्रचार मोहिमेत प्रचार होईलच असे सांगता येत नाही. त्यातील काही मुद्दे दोन्ही पक्षांनी सातत्याने मांडले. मात्र मुख्य भर एकमेकांवर आरोप करणे, वैयक्तिक टीका करणे आणि विकृत स्वरुपात विरोधकांची मांडणी लोकांसमोर ठेवणे यावरच दिसून येत आहे. एकूणच, आता प्रचाराची पातळी घसरली असून प्रचार मोहिमेमध्ये अपेक्षित सभ्यता, लोकशिक्षणाचा विचार आणि विरोधकांनाही सन्मानाने वागवणे या बाबी मागे पडत असून दोन्ही आघाड्यांमधील सदस्य येनकेन मार्गाने विरोधकांवर कुरघोडी करण्याची संधी सोडत नसल्याचे दिसते. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यामध्ये भारतीय जनता पक्षाने रामजन्मभूमीत मंदिर उभारण्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, एकदा राममंदिर बांधले गेल्यानंतर तो मुद्दा आता तेवढा महत्वाचा राहिलेला नाही. पहिल्या टप्प्यातील मतदान सुमारे तीन टक्क्यांनी कमी झाल्यामुळे पंतप्रधान मोदी यांनी जास्त आक्रमक भूमिका घेतली आणि काँग्रेस पक्षावर, विशेषतः राहुल गांधींवर कठोर टीका करण्यास सुरूवात केली. या टिकेला मुख्यतः प्रियांका गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांनी तशाच भाषेत उत्तरे दिली. राहुल गांधी यांच्या प्रचारात काँग्रेसने चार मुद्दे मांडले होते. त्यांचा उल्लेख करत मोदींनी आपल्या भाषणात कठोर हल्ले केलेले दिसून येतात.

काँग्रेस आणि राहुल गांधी यांनी मांडलेल्या मुद्द्यांमध्ये सहिष्णु राष्ट्रवादाची मांडणी करण्यात आली होती. त्याच वेळी द्रमुकचे नेते उदयनिधी स्टॅलिन यांनी हिंदू धर्मावर कठोर टीका करण्याचा मुद्दा मोदींनी बरोबर उचलून धरल्याचेही दिसून आले. राहुल गांधींनी जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय जाहीर केला आणि त्याप्रमाणे ज्यांची जितकी संख्या त्याला तितकी सरकारी मदत, अशी भूमिका मांडली. त्याचबरोबर काँग्रेस पक्षाने नाही परंतु, सॅम पित्रोदा यांनी वारसा कराची कल्पना मांडली. थोडक्यात, समाजाच्या वेगवेगळ्या घटकांमध्ये संपत्तीचे योग्य प्रकारे वाटप व्हावे ही त्यामागील भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तिसरा मुद्दा मोदी सरकारने आंतरराष्ट्रीय राजकारणात फारसे काही केले नसून एकीकडे चीनने भारताची जमीन ताब्यात घेतलेली आहे तर पाकिस्तानही शत्रुत्वाची भावना जोपासताना दिसत आहे, हा आहे. त्यामुळे परराष्ट्रधोरण अयशस्वी ठरलेले आहे. चौथा मुद्दा अल्पसंख्यकांवरील अन्यायाचा आहे.

मोदी यांनी आपल्या प्रचार मोहिमेत काँग्रेस पक्षावर तीव्र हल्ला केला आणि अनेक वेळा सत्याचा आपलाप केला. मोदी यांनी मांडलेले काही मुद्दे म्हणजे काँग्रेस पक्षाचा राष्ट्रवाद मूलतः हिंदूविरोधी राष्ट्रवाद आहे. रामजन्मभूमी मंदिराच्या उद्घाटनाला ते आले नाहीत. ज्या उदयनिधी स्टॅलिनने हिंदू धर्म डेंग्यु, मलेरियासारखा आहे असे म्हटले, त्याच स्टॅलिन यांचा पक्ष इंडिया आघाडीतील महत्त्वाचा घटक आहे. काँग्रेस ही 'तुकडे तुकडे गँग' असून इंडिया आघाडीत काही घटकांना देशाचे विघटन करायचे आहे. मोदी यांनी काँग्रेस पक्षाने वारसा कर लावण्याचा मुद्दा पुन्हा चर्चेत आणला. वारसा कर म्हणजे तुमच्या मृत्यूनंतर संपत्तीतील निम्मा हिस्सा सरकार आपल्या ताब्यात घेणार आणि त्यातून मिळालेला पैसा मनमोहनसिंग यांनी सांगितल्याप्रमाणे अल्पसंख्याकांमध्ये वितरित करणार, असाही आरोप त्यांनी केला. मोदी म्हणाले की, याचा अर्थ देशात घुसखोरी करणारे आणि अनेक मुले असणाऱ्या लोकांना तुमच्या घामाचा पैसा काँग्रेसचे सरकार वाटणार आहे. यामधून ध्रुवीकरणाचे राजकारण स्पष्ट होते. मोदी यांच्या मते ही आर्थिक न्यायाची कल्पना अर्बन नक्षलवादाचीच आहे. पुढचा मुद्दा म्हणजे काँग्रेसच्या काळात पाकिस्तानने काश्मीरचा काही भाग घेतला. चीनने लडाखचा भाग घेतला आणि काँग्रेस सरकारनेच कचाथेवू नावाचे बेट श्रीलंकेला दिले. त्यामुळे या लोकांच्या हातामध्ये सत्ता दिली तर देशाचे भवितव्य अडचणीत येईल. मोदी म्हणतात, काँग्रेसच्या काळातच जातीय दंगे, हिंसाचार आणि दहशतवादी हल्ले झाले. गेल्या दहा वर्षांमध्ये असे हल्ले झाले नाहीत, कारण आम्ही शत्रूच्या घरात घुसून शिक्षा करतो. म्हणूनच काँग्रेसचे सरकार कमकुवत तर आमचे बलवान...

अशा प्रकारे दोन्ही आघाड्यांमध्ये आक्रमक प्रचार मोहीम राबवून मतदारांना आपल्याकडे खेचण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या दोन्ही मांडण्यांवरुन दिसते की त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात वैचारिक मतभेद आहेत. म्हणूनच निवडणुकीचा निकाल कसाही लागो, नंतरच्या काळात संघर्षाचे राजकारण अधिक तीव्र होण्याची शक्यताच जास्त आहे.

आजकाल

# मोदीजींच्या गळाला लागलं की...

**आनंद भंडारे**

पहिली गोष्ट होते. ती म्हणजे विरोधी पक्षातील महिलांबद्दल निंदाजनक, हीनकस किंवा अतिशय गलिच्छ पध्दतीने बोलणं आवश्यक होतं. कालच्या राज ठाकरेंच्या सभेत सुषमा अंधारेंचा ज्या पध्दतीने 'ती बाई' असा केला आहे, तो याच कॅटेगरीतला आहे. म्हणजे सुषमा ताईंच्या नावाचा उल्लेख न करता त्यांना अनुल्लेखाने मारणं ही एक स्ट्रॅटजी असू शकते. उगीच आपण नाव घेतल्याने अधिकची प्रसिध्दी त्यांना मिळायची, असा सुप्त विचारही केला असावा. पण कालच्या राज ठाकरेंच्या बोलण्यात फक्त स्ट्रॅटेजी किंवा असूया नव्हती. तर सुषमा अंधारेंचं नाव घेतलं तर आपल्या जीभेला विटाळ होईल की काय अशी धास्ती दिसत होती. लता मंगेशकर किंवा आशा भोसले यांचा 'ती बाई किती छान गाते' असा उल्लेख राज ठाकरे खाजगीत तरी करतील का? मग असा जाहिर उल्लेख फक्त सुषमा ताईंबद्दलच का? सोनिया गांधी, ममता बॅनर्जी किंवा मायावती यांच्याबद्दल भक्त मंडळी ज्या पध्दतीने बोलतात ते कुणाही सुज्ञ व्यक्तीला लाजिरवाणेच वाटतं. मध्यंतरी सूरज सामंत यांनी मोदीजी आणि त्यांचे भाजपाई महिलांबद्दल किती खालच्या पातळीवर जाऊन बोलतात त्याची यादीच दिली होती. मोदीजींचे मनता बॅनर्जींना 'दीदी ओ दीदी' म्हणण्यात आणि कालच्या राज ठाकरेंच्या भाषणात सुषमा अंधारेंना 'ती बाई' असं म्हणण्यात काहीही फरक नाही. !

दुसरी गोष्ट घडते. ती म्हणजे मुस्लिमांबद्दल जाणीवपूर्वक पराकोटीचा द्वेष पसरवणं. कालच्या राज ठाकरेंच्या भाषणातील मुस्लिम अतिरेकी आणि मुंब्रा यांचा जो काही संबंध त्यांनी लावला आहे, तो याचीच प्रचिती आहे. जणू मुंब्रा हे मुस्लिम अतिरेक्यांचे माहेरघरच आहे, असंच त्यांना म्हणायचं होतं. शिवाजी पार्कवरच्या त्यांच्या पुढील सभेत मुस्लिम अतिरेकी आणि मानखूर्द अशीही यादी ते वाचण्याची शक्यता आहे. जोडीला चांगले मुसलमान, देशभक्त मुसलमान हे लोणच्याचं बोट लावायला ते अजिबात विसरणार नाहीत. चांगला मुसलमान आणि वाईट मुसलमान यांची उठाठेव करण्याची एखाद्यावर वेळ आली की तो मोदीजींच्या गळाला लागला, असं खुशाल समजावं! खरंतर या अशा उठाठेवी करण्यापेक्षा करकरेंच्या शरीरातील गोळ्या अतिरेक्यांच्या बंदुकीतील नाही हे निकालपत्रात नमूद आहे, तर मग या गोळ्या कुणाच्या बंदुकीतून सुटल्या, असा बिनतोड प्रश्न करून तत्कालीन कॉंग्रेस सरकारला हजार फूट मागं रेटणं राज ठाकरेंना सहज शक्य होतं. पण मोदीप्रेमात तारतम्य राहत नाही. तिथे फक्त जळी, स्थळी मुस्लिमांबद्दल द्वेष पसरवणं एवढंच काम उरतं! कधीकाळी आयटी सेलची बेवारस पोरं असा ज्यांचा उल्लेख केला होता, त्यांनीच पसरवलेले व्हॉटस्अॅप युनिवर्सिटीचे मेसेजेस फॉरवर्ड करण्याची वेळ आता राज ठाकरेंवर आली आहे! मोदीजींच्या गळाला लागल्याचा चमत्कार म्हणतात तो हाच! तिसरा बदल होतो. तो म्हणजे व्यक्तीची कल्पकता, नैसर्गिकता नष्ट होते. कधीकाळी 'लाव रे तो व्हिडिओ' म्हणत मराठीसह हिंदी, इंग्रजी प्रसारमाध्यमातून देशभरातील घराघरात चर्चेचा विषय झालेले राज ठाकरे आता तीस सेकंदाच्या व्हिडिओवर आलेत. यातून आपल्याच कल्पकतेला आपणच मूठमाती देत आहोत, हे ही त्यांना दिसेनासे झाले आहे. आता त्यांची भाषणे पहिल्यासारखी एक एक तासाची होत नाहीत. वीस पंचवीस मिनिटात भाषण उरकतात. कुणीतरी सांगतंय म्हणून भाषणाला आलो आहे, हे सतत त्यांच्या देहबोलीतून जाणवत राहतं. खरंतर यंदाच्या निवडणुकीत एकच एक मुद्दा नाहीय. बेरोजगारी, महागाई, महिलांची सुरक्षितता, चीनचे आक्रमण, रूपयाचे अवमूल्यन, नोटबंदीचे अपयश, इलेक्ट्रोल बॉण्ड, विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात डांबणे, भ्रष्ट नेत्यांना क्लीन करून घेणे, शेतकरी आंदोलन असे अनेक मुद्दे आहेत. कधी नव्हे तेवढे यंदा अनेक मुद्यांवर निवडणूक होत आहे. पण यंदाच्या निवडणुकीला मुद्दाच नाही असे राजसाहेब काल भाषणात म्हणाले. का? कारण वरचे सगळे मुद्दे मोदींच्या विरोधात आहेत. जिथे या मुद्यांवर मोदीजीच काही बोलत नाहीत, तर राजसाहेब तरी कशाला बोलतील? त्यामुळे त्यांची भाषणे आता पुरती गंडून जातात. माझा विरोध मुद्यांवर होता, स्वतःला काहितरी पाहिजे होतं म्हणून मोदींच्या विरोधी बोलत नव्हतो, माझे नगरसेवक फोडताना काही वाटलं नाही का, हे असले मुद्दे त्यांच्यात अजून स्पार्क असल्याचे दाखवतात खरे. पण पहिल्यासारखा चार्म आता राहिला नाही. आता स्टेजवर एखाद्याला बोलावून समोरच्याची पोलखोल नाही, पुस्तकातील उतारे नाहीत, खिळवून ठेवणारी रंजकता नाही. हे सगळं मोदीजींनी त्यांच्याकडून हिरावून नेलंय. बदल्यात 'मला फेविकोल लागला नाही त्यामुळे मी काहीही बोलू शकतो', हा असला उद्दामपणा दिलाय. खरंतर स्वतःचा राजकीय पक्ष असताना स्वतः आणि आपल्या कार्यकर्त्यांना दुसऱ्याच राजकीय पक्षांसाठी जीव आटवावा लागतोय, याची खंत त्यांना असायला हवी. कदाचित महापालिकेच्या निवडणुकीसाठीची ती तात्पुरती तडजोड असेलही. पण तात्पुरतं का होईना, राज ठाकरे आणि रामदास आठवले या दोहोंनाही मोदीजींनी एकाच लायनीत आणलंय, हे सबंध महाराष्ट्राला पहावं लागलंय!

लोकसंसद

### पालिका प्रशासनाने वेळीच उपाययोजना कराव्यात

मुंबईत सोमवारी पडलेल्या अवकाळी पावसाला वादळी वाऱ्याची साथ मिळाली आणि अवघ्या तासाभरात दोन मोठ्या दुर्घटना घडल्या. घाटकोपर येथे अनधिकृत जाहिरात फलक पेट्रोल पंपावर कोसळल्यामुळे काही जणांना जीव गमवावा लागला. तर काही जण जखमी झाले आहेत. वडाळ्यात पार्किंगसाठी उभारलेली लोखंडी परातच कोसळली. झाडे पडण्याचे प्रकारही घडले. येणाऱ्या पावसाळ्यात काय घडू शकते. याची झलकच या अवकाळी पावसाने दाखवून दिली. मध्य रेल्वेच्या प्रवाशांना याच अवकाळी पावसाने दिलेला मनःस्ताप वेगळाच. पालिका प्रशासनाने पावसाने दिलेला हा इशारा वेळीच ओळखून आपत्ती व्यवस्थापनाकडे लक्ष देऊन ते सक्षम करावे. अनधिकृत जाहिरात फलक हटवावेत, मोडकळीस आलेल्या जुन्या इमारतीतील रहिवाशांचे स्थलांतर करावे, डोंगराळ भागातील वस्तीनजिकच्या दरडींचे सर्वेक्षण करावे. नाहीतर पावसाळ्यात अशाच दुर्घटना घडू शकतात असे खेदाने म्हणावे लागेल.

- दीपक काशिराम गुंडये, वरळी.

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१५ मे**

**१८७०:-** कवी, काव्यसमीक्षक आणि साहित्य विवेचक वा. ब. पटवर्धन यांचा जन्म. जुन्या मराठी काव्याचा व्यासंग असलेल्या पटवर्धनांनी 'वसंत' या टोपणनावाने काव्यलेखन केले. 'काव्य आणि काव्योदय' हा त्यांचा प्रसिध्द ग्रंथ. आगरकरांचे कट्टर समर्थक असणाऱ्या पटवर्धनांनी आगरकरांच्या मृत्यूनंतर त्यांचे 'सुधारक' हे पत्र चालवले. याखेरीज 'राजनीतीची मूलतत्त्वे', 'शिक्षण','शिक्षक व अभ्यासक्रम', 'वाग्विहार' ही पुस्तके, 'सारेच विलक्षण' ही कादंबरी त्यांच्या नावावर जमा आहे. त्यांची इंग्रजी-मराठी वाड्ःमय विषयक व्याख्यानेही पुस्तकरुपाने प्रसिध्द झाली. त्यांनी 'काळाच्या दाढेतून' या दीर्घकाव्याला आणि 'विनायकाची कविता' या संग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेतून त्यांची साहित्यसंबंधीची स्वतंत्र विवेचकता दिसून येते. **१८७९:-** भाषाभ्यासक, संस्कृतचे भाषांतरकार यशवंत गणेश फके यांचा जन्म. चिपळूणकर आणि मंडळी यांनी प्रकाशित केलेल्या 'श्रीमन्महाभारत' ह्या ग्रंथाचे मराठी सुरस भाषांतर : पुस्तक चौथे भीष्मपर्व व द्रोणपर्व' हा ग्रंथ तयार करण्याच्या कामी म. ह. मोडक यांना सहकार्य केले. तसेच 'शालेय व्युत्पत्तिदीपिका' आणि 'शुध्दलेखनशिक्षण' ही स्वतंत्र पुस्तकेही त्यांच्या नावावर आहेत. **१८९३:-** कवी, टीकाकार दत्तात्रेय नारायण कर्वे यांचा जन्म. प्रज्ञानानंतर या नावाने लेखन. रामचरितमानसाचे समश्लोकी समवृा रुपांतर व रामश्लोकी भगवद्गीता असे त्यांचे दोन ग्रंथ प्रसिध्द आहेत. तसेच त्यांनी स्पुट कविताही बऱ्याच लिहिल्या आहेत. **१८९७:-** ऐतिहासिक चरित्रकथालेखक विनायक गंगाधर लेले यांचे निधन. 'दुर्दैवी मोहरे : सर्जेराव धांडया व त्रिंबकजी डेंगळा', 'सुरजमल जाट', 'जहिरुीन महंमद उर्फ बाबू', 'नरवीर बापू गोखले' यांच्या चरित्रासह 'मराठ्यांच्या वीरकथा', 'शिवशाहीचा अस्त', 'कळस' 'मयुर', 'सिंहासन' अशा ऐतिहासिक कथा त्यांनी लिहिल्या. याशिवाय लेले यांनी स्वामी श्रध्दानंदाच्या ग्रंथाचे भाषांतर 'हिंदुसंघटन' या नावाने प्रसिध्द केले. **१९०३:-** कवी व समीक्षक प्रा. रामचंद्र श्रीपाद जोग यांचा जन्म. 'निशिगंध' या नावाने त्यांनी काव्यरचना केली, तीन काव्यसंग्रह निघाले, परंतु त्यांची ओळख संस्कृत व अर्वाचीन मराठी काव्याचे सखोल अभ्यासक अशी राहिली. 'मराठी वाड्ःमयाभिरुचीचे विहंगमावलोकन', 'अभिनव काव्यप्रकाश', 'काव्यविभ्रम', 'सौंदर्यशोध', 'आनंदबोध' ही पुस्तके अभ्यासकांना आजही उपयुक्त आहेत. 'केशवसुत काव्यदर्शन' ह्या काव्यसंग्रहासह 'समग्र माधव ज्युलियन' हे संपादीत साहित्य आणि 'दक्षिणा', 'वाड्ःमयविमर्श व मराठी समीक्षा' आदी महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९१७:-** इतिहास, मराठी, भाषा, व्याकरण, ना. शास्त्र या विषयावरील क्रमिक पाठ्यपुस्तकांचे लेखक, पत्रकार आणि शालापत्रक, सात्विक, समर्थ या नियतकालिकांचे कार्यकारी संपादक शंभुराव रामचंद्र देवळे यांचा जन्म. 'असा इतिहास अशी माणसे- भाग १,२' मधून थोर व्यक्तींची चरित्रे याशिवाय 'इतिहासातील स्त्री रत्ने', 'आपले पंतप्रधान', 'आपले राष्ट्रपती' मिळून ४० हून अधिक थोर पुरुषांची चरित्रे साकारली. याशिवाय 'अखेर कोडे उलगडले', 'अपूर्व भेट' मिळून १००एक गोष्टींच्या संग्रहाची पुस्तके. 'उंब्रगामा', 'खजिन्याचे बेट' मिळून पंचवीस एक कादंबरीका. 'आगऱ्याहून सुटका', 'पानिपतचा रणसंग्राम' मिळून दहा एक ऐतिहासिक पुस्तके. 'कथा भागवत', 'सुलभ रामायण' मिळून तीस एक पौरोणिक पुस्तके. पंचवीस एक सांस्कृतिक पुस्तके. दहाहून आधिक धार्मिक, १५ च्या आसपास नवसाक्षरांसाठी पुस्तके, चाळीस एक क्रमिक पुस्तके आणि काही संपादित पुस्तके आदी साहित्य संपदा. **१९३०:-** मातृभाषा उर्दु असूनही मराठीतून लेखन करणारे लेखक मोहम्मद अन्वर सरदारखान यांचा जन्म. 'रत्ना', 'श्रध्दा' या त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. **१९३५:-** लेखक प्रभाकर शंकर गोखले यांचा जन्म. ह्यांनी जर्मनीच्या प्रवासवर्णनावर 'असे रंग असे ढंग' हे पुस्तक लिहिले. **१९३८:-** लेखक आणि डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांचा जन्म. दिल्ली येथे सिरम संस्थेत भूतपूर्वसंचालक. 'ढगातून गडगडत छाया' (कवितासंग्रह), 'ना डावं ना उजवं (माहितीपर लेखसंग्रह)', 'शोध स्वामी विवेकानंदांचा', 'नर्मदा प्रकल्पाची शोधयात्रा', 'राजधानी इंद्रप्रस्थ', 'समग्र मते नर्मदे' अनेक पुस्तकांचे हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषांमधून अनुवाद. **१९३९:-** किशोर, कुमार, बिरबल, विज्ञानपुत्र, सृष्टीज्ञान आदी मासिकातून बालकथा, विज्ञानकथा लिहिणारे लेखक ज्ञानदेव रामचंद्र चौधरी यांचा जन्म. ह्यांची 'चतुर लच्छी', 'चातुर्यकथा', 'साहसी सून' व इतर सुरस कथा आदी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. **१९४२:-** सामाजिक, राजकीय, ललित विषयांवर लेखन करणारे आणि सावित्रीबाई फुले एज्युकेशन सो. संस्थापक, अध्यापक नानासाहेब संतू झोडगे यांचा जन्म. पेशाने वकील. यांची 'फांजर' ही आत्मकथा अशी साहित्य संपदा. **१९४५:-** कवी त्रिकोलवार नारायणस्वामी रतनध्यायी यांचा जन्म. ह्यांच्या साहित्यसंपदेत 'ओंजळ, नजराणा', 'गजय', 'श्री गजानन महाराज अमृतधारा' हे काव्यसंग्रह. 'फक्त तुझ्यासाठीच' हा चारोळी संग्रह इ. **१९५२:-** लेखक नाट्यदिग्दर्शक तुळशीदास हरिश्चंद्र बेहरे यांचा जन्म. ह्यांचे 'म्युझियम' हे नाटक, 'सव्हेअर आणि इतर एकांकिका' अशी साहित्यसंपदा.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ मे

१) श्री. मनोहर आत्माराम राऊत नवगाव, अलिबाग, १५-५-१९४०
२) श्री. मधुकर पुरूषोत्तम किल्लेकर श्रीबाग, अलिबाग, १५-५-१९५१
३) श्रीम. राजश्री बळीराम पाटील अलिबाग, १५-५-१९५२
४) श्री. शंकर राम मोर्ले कोळीवाडा, अलिबाग, १५-५-१९५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# मेंढपाळांची अवकाळीमुळे वाताहत

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

**राज्यात शेळी-मेंढीपालन व्यवसाय दुष्काळी व निमदुष्काळी भागात मेंढपाळांकडून विशेषत: धनगर समाजाकडून केला जातो. चारा-पाण्यासाठी अनेक मेंढपाळ घाटमाथ्यावरील रायगड जिल्ह्यात दरवर्षी दाखल होतात. मात्र, येथील वाढता उष्मा व पाण्याची कमी होत असलेली उपलब्धता यामुळे चारापाण्यासाठी रणरणत्या उन्हात मेंढ्या व बकऱ्यांची पायपीट करत मेंढपाळांना भटकंती करत फिरावे लागत आहे. या मेंढपाळांचा परतीचा प्रवास आता सुरू झाला आहे. अवकाळी पावसामुळे त्यांची वाताहतदेखील झाली.**



घोडे किंवा खच्चरावर आपला लवाजमा, राखणदार कुत्रा व मेंढ्या घेऊन कुटुंब कबिल्यासोबत शेकडो किलोमीटरची पायपीट करत हे मेंढपाळ रायगड जिल्ह्यात दाखल होतात. अक्षरशः हालअपेष्टा सहन करून कडक उन्हात उघड्यावर संसार थाटततात. रायगड जिल्ह्यात पावसाळी भातशेती केली जाते. पावसाळ्यानंतर काही शेतकरी कडधान्य पिके घेतात. त्यांनतर पावसाळ्यापर्यंत भातशेती पडीक असते. अशा भातशेती व माळरानावर अनेक महिने राहून आपल्या मेंढ्यांना व स्वतःच्या पोटा-पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न हे मेंढपाळ करतात. शेतात किंवा माळरानावर कापडी तंबू टाकून तेथेच आपल्या कुटुंब कबिल्यासह मेंढपाळ राहतात. आजूबाजूला असलेली नदी, ओहळ, तलाव किंवा तलावातील पाणी वापरतात. रणरणत्या उन्हात मेंढ्यांना शेतातील सुका चारा मिळतो. या मेंढ्या शेतात लेंड्या टाकतात. या लेंड्यांमुळे शेतकऱ्याला आपोआप लेंडी खत मिळते. त्यामुळेच अनेक शेतकरी मेंढपाळांना आपल्या शेतामध्ये राहण्यासाठी परवानगी देतात. एका शेतातील मुक्काम संपल्यावर दुसऱ्या शेतावर मुक्काम करत हे मेंढपाळ फिरत असतात. आणि पावसाळा सुरू होण्याच्या काही दिवस आधी येथील मुक्काम हालवून आपल्या मूळ गावी परततात.

त्यांना शेळ्यांपासून मांस, दुध, कातडी, लेंडीखत आणि याबरोबरच मेंढ्यांपासून लोकर उत्पादन मिळते. हा व्यवसाय अत्यंत कष्टमय असून, मेंढपाळ ऊन, वारा, पाऊस यांचा विचार न करता आणि सर्व सुखसोयी न उपभोगता दिवस रात्र मेंढ्यांच्या कळपात राहून हा व्यवसाय मेंढपाळ करतात. अतिउष्मा, रोगराई यामुळे अनेक मेंढ्या मृत्युमुखीसुद्धा पडतात. हा व्यवसाय परंपरागत पद्धतीने केला जात असल्यामुळे मेंढपाळ विमा वैगेरे उतरवित नाहीत. त्यामुळे मेंढी दगावल्यास किंवा हे हिंस्र प्राण्यांनी खाल्ल्यास मेंढपाळांचे मोठे नुकसान होते.

### शिक्षणापासून वंचित

**सततची भटकंती असल्यामुळे मेंढपाळांच्या मुलांना शिक्षणापासुन वंचित राहावे लागते. मेंढपाळांना आपले मूळ गाव सोडून अनेक महिने मुलाबाळांना घेऊन शेकडो किलोमीटर इतरत्र भटकंती करत राहावे लागत असते. मग अशा परिस्थितीत त्यांच्या मुलांना शिक्षण तरी कुठून मिळणार?**

### आरोग्यावर परिणाम

**वाढत्या उष्म्याचा परिणाम मेंढ्यांसह मेंढपाळांवरदेखील होताना दिसतो. भटकंतीचे जीवन असल्यामुळे त्यांना शुद्ध पाणी व उत्तम दर्जाचे अन्न मिळत नाही. परिणामी, त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम घडतो. अशावेळी चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा त्यांना मिळत नाही. जवळच्या सार्वजनिक आरोग्य सेवेवरच अवलंबून राहावे लागते. तसेच शेकडो कि.मी. दूर आल्यामुळे जवळचे नातेवाईकदेखील सोबत नसतात, त्यामुळे मदतीसाठीदेखील लवकर कोणी येत नाही.**

# अलिबागमध्ये हातमाग प्रदर्शनाचे उद्घाटन



**। अलिबाग । वार्ताहर ।**

भाऊराया हॅण्डलुम सोलापुर यांचे हातमाग कापड प्रसार प्रसिद्धी व विक्री कार्यक्रमांतर्गत हातमाग कापड प्रदर्शन दि. ६ ते ३१ मेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. यावेळी विविध वस्तूंची विक्रीसुद्धा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

अलिबाग शहरातील सार्वजनिक वाचनालय, डोंगरे हॉल येथे या प्रदर्शनाचे आयोजन केलेले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल भालचंद्र वर्तक यांच्या हस्ते फीत कापून दीप प्रज्वलन करून पार पडले. याप्रसंगी पांडुरंग पोतन, गोवर्धन कोडम, बाळू कोडम, पुरुषोत्तम पोतन, दीपक गुंडू, श्रीकांत श्रीराम, लक्ष्मण उडता, अशोक नंदाल आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रदर्शन प्रमुख पांडुरंग पोतन म्हणाले की, यांत्रिक युगामध्ये स्पर्धा करीत सर्व समस्यांशी सामना करून त्यांचे पिढीजात पारंपारिक हातमागावर समृद्धीचे वस्त्र विणण्याचे आणि वस्त्र संस्कृतीच्या अमूल्य ठेवा जोपासण्याचे काम आपले विणकर अविरतपणे काम करीत आहे. त्यांच्या या गतिशील प्रयत्नांना प्रोत्साहन मिळावे व त्यांनी तयार केलेल्या हातमाग कापडाला योग्य बाजारपेठ मिळावी त्याकरिता हातमाग वस्त्रोद्योग मध्ये काम करणाऱ्या संस्थांचे योगदान मिळून बळकटीकरण व सक्षमी करण करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण या कलेवरच कामगारांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे.

या प्रदर्शनास अलिबागकरांनी बहुसंख्येने भेट देऊन विणकर कामगारांची कलेला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन जास्तीत जास्त प्रमाणात खरेदी करून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# विठ्ठल रखुमाईचा सोहळा उत्साहात

**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरातील भोईरवाडी येथे सोमवार, दि.१३ व मंगळवार, दि.१४ मे रोजी श्री विठ्ठल रखुमाई मंदिराचा ६६ वा वर्धापनदिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. सोमवारी काकड आरती, अभिषेक, मंगल स्नान, कीर्तन, महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता. सायंकाळी विठ्ठल रखुमाईची पालखी मिरवणूक काढण्यात आली. तर, मंगळवारी श्री सत्यनारायणाची महापूजा, व्याख्यान व विविध मनोरंजनाचे कार्यक्रम, ग्रामस्थांचे भजन, सत्कार समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम असे विविध कार्यक्रम पार पडले. याप्रसंगी ग्रामस्थ मंडळ,मुंबईकर मंडळ,महिला मंडळ व हौशी बाल मित्र मंडळ भोईरवाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## पान १ वरुन

### ‘त्यानं’ सांगावा धाडलाय, वेळेआधीच बरसणार!

गेल्या वर्षी १६ जूनला मान्सून राज्यात दाखल होता. मात्र, यंदा मान्सूनचे आगमन लवकर होणार आहे.

एप्रिल महिन्यापासून तापमानाचा पारा प्रचंड वाढला आहे. देशात अनेक ठिकाणी तापमानाने उच्चांक गाठला आहे. तर महाराष्ट्रासह कोकणाच्या परिसरात उकाडा असह्य होत आहे. त्यातच आता हवामान खात्याने मान्सूनच्या आगमनाचे संकेत दिले आहेत. तसेच यावर्षी पर्जन्यमान सरासरीएवढे असेल, असाही अंदाज वर्तवण्यात आल्याने शेतकऱ्यांनाही दिलासा मिळाला आहे. तसेच आता नागरिकांनाही उकाड्यापासून लवकरच दिलासा मिळणार आहे.

### जनता तापली, पाणी पेटले

पाण्यावाचून नागरिकांचे हाल होत आहेत.

तातडीने धरणातील गाळ काढला नाही आणि दुरुस्ती केली नाही, तर यंदाच्या पावसाळ्यात धरण फुटण्याची भीती ॲड. राकेश पाटील यांनी व्यक्त केली. धरणासाठी २१५ कोटी रुपये मंजूर असल्याचे आम्हाला जिल्हा परिषदेकडून सांगण्यात येते, मात्र खरच एवढी मोठी रक्कम धरणासाठी खर्च होणार की ठेकेदाराच्या खिशात जाणार, असा प्रश्न ॲड. पाटील यांनी उपस्थित केला. सरकार आणि प्रशासनाने हा प्रश्न सोडवला नाही, तर आंदोलन उभारावे लागेल, असा इशारा निवदेनातून दिला आहे.

उमटे धरणाच्या पाण्यावर अलिबाग तालुक्यातील तब्बल ४४ गाव आणि ३३ आदिवासी वाड्यांतील जनता अवलंबून आहे. आक्षी, नागाव, चौल परिसरात पर्यटनावर आधारित छोटे-मोठे व्यवसाय आहेत. पाणी उपलब्ध झाले नाही, तर पर्यटन व्यवसाय बुडण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथील नागरिकांच्या रोजगारावर फार मोठा आघात होत असल्याचे नागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी सांगितले.

दोन वर्षांपूर्वी ४५ लाख रुपये पाईप लाईनवर खर्च करण्यात आले. मात्र, धरणातील गाळ आधी काढणे गरजेचे होते, असे ॲड. कौस्तुभ पुनकर यांनी शिर्के यांच्या निदर्शनास आणून दिले. याप्रसंगी नंदेश गावंड, ॲड. मधुकर वाजंत्री, विकास पिंपळे, निखील मयेकर, लवेश नाईक, यतिराज पाटील यांच्यासह अन्य नागरिक उपस्थित होते.

### मातीच्या धुरळ्यावर पाण्याचा उतारा

न करता टँकरच्या टँकर मार्गावर ओतले जात आहे. खरंच, महामार्गाचे काम पूर्ण करायचं की, फक्त धुरळ्यावर पाण्याचा उतारा देत वेळ मारुन न्यायची आहे, असा प्रश्न जनता विचारत आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कोलाड, खांब, सुकेळी, वाकणदरम्यान रस्त्याला पावसात पडलेले खड्डे व काही ठिकाणी नवीन कामासाठी चाललेली खोदाई त्यातून तयार होत असलेला धुरळा यामुळे मार्गावरून प्रवास करताना प्रवाशांची तारांबळ उडत आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेली बारा-तेरा वर्षांपासून सुरू असून, या कामात कोणतीही प्रगती नाही. परंतु, या मार्गाचे रखडलेले काम, त्यामुळे होत असलेला धुरळा याला पर्याय म्हणून या रस्त्यावर गेली अनेक वर्षे पाण्याची फवारणी करण्याचे काम सुरू आहे. काही ठिकाणी पिण्यासाठी पाणी नाही. मात्र, कोकणात त्याच पाण्याचे मोल काय? दररोज लाखो लीटर पाणी केवळ धुरळ्यावर वाया जात आहे, त्यामुळे हा जगातील पहिला राष्ट्रीय महामार्ग असावा की ज्यावर पाण्याची फवारणी केली जाते अथवा कोणताही विचार न करता टँकरच्या टँकर मार्गावर ओतले जात असून, पाण्याची नासाडी होत आहे. धुरळ्यावर पाणी फवारणी करून जणू टाईमपास सुरु असल्याचा आरोप जनतेतून होत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील ब्रिटिश काळातील बनविलेले जुने रस्ते वर्षानुवर्षे चालले; परंतु या महामार्गावरील चौपदरीकरणात बनविण्यात आणलेले काही रस्ते व काँक्रिटीकरण वाहतुकीसाठी लगेचच धोकादायक ठरत असून, प्रवाशांच्या जिवाशी जणू खेळ मांडला आहे, असा आरोप प्रवाशांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, काही ठिकाणचे खड्डे अद्याप जैसे थे असताना नव्या कामाला ताबडतोब सुरूवात केली जाते. मात्र, दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे या धुळीला कितीही पाणी मारले तरी ही धूळ दहा मिनिटांत कोरडी पडत आहे. ही धूळ मुंबई-गोवा महामार्गावर असणाऱ्या व्यावसायिकांच्या दुकानात पसरून मोठे नुकसान होते. शिवाय, ही धूळ या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या अंगावर उडत आहे. यामुळे ही धूळ नागरिकांच्या नाका-तोंडात जाऊन सर्दी, खोकला व श्वसनाच्या आजाराला सामोरे जावे लागत आहे. तर, ही धूळ डोळ्यात जाऊन अपघाताचा धोका निर्माण होत आहे.

### जरांगेंचा पुन्हा एल्गार

यातूनच मराठा समाजाची ताकद दिसून येते, अशी टीका त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. मोदींना ही वेळ फक्त त्यांच्या पक्षातील काही नेत्यांमुळे आली आहे, असा टोलाही जरांगे यांनी नाव न घेता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना लगावला.

मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण मिळावे, अशी मागणी करतानाच ज्यांचे कुणबी असल्याचे पुरावे सापडतील, त्यांच्या सगेसोयर्यांनाही कुणबी दाखले देण्याची मागणी केली होती. ही मागणी घेऊन लाखोंच्या संख्येने मराठा समाज मुंबईच्या वेशीवर धडकल्यानंतर वाशी येथे २६ जानेवारीला या आंदोलनावर तोडगा काढण्यात आला. राज्य सरकारने जरांगे यांची दुसरी मागणी मान्य करत ज्यांच्या कुणबी नोंदी सापडतील त्यांच्या सगेसोयऱ्यांनाही कुणबी दाखले देण्याविषयी काढण्यात येणाऱ्या अधिसूचनेचा मसुदा सोपविण्यात आला. ही मागणी मान्य झाल्यावर जरांगे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उपोषण संपल्याची घोषणा केली होती. मात्र, त्यानंतर ही अधिसूचना अंतिम झाली नसल्याने जरांगे यांनी राज्य सरकारवर विश्वासघात केल्याचा आरोप केला होता.

### उन्हाळी शेती पाण्याखाली

**तालुक्यातील ४० गावांमधील शेतकरी भाताची शेती करतात.उन्हाळी भाताची शेती बहरली असून, सध्या भाताची शेतीचा कापणी हंगाम सुरू आहे. या काळात अनेक शेतकऱ्यांनी मजूर घेऊन भाताचे पीक कापून ठेवले आहे, तर काही शेतकऱ्यांच्या शेतात भाताचे पीक आजही उभे आहे. या दोन्ही पिकांची मागील सलग चार दिवस सुरू असलेल्या अवकाळी पावसाने अक्षरशः वाट लावली आहे.**

अंगणवाडीचे नुकसान

कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायतीमध्ये वावे गाव असून या गावात काल आलेल्या वादळी वाऱ्याने मोठे नुकसान झाले.तेथील ग्रामस्थांच्या घरांचे किरकोळ नुकसान झाले असून त्या गावातील अंगणवाडी केंद्राचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. अंगणवाडी केंद्रावर बसवलेली नवीन लोखंडी पत्रे वादळात उडून गेली आहेत.तर त्या खाली बसवण्यात आलेले फायबर सीलिंग कोसळून देखील मोठे नुकसान झाले आहे.

आंबापिकाचे मोठे नुकसान

पोलादपूर तालुक्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी पावसाने प्रचंड हानी पोहोचवली आहे. तालुक्यातील ४५० हून अधिक हेक्टर क्षेत्रातील आंबा बागायतीपैकी अंदाजे २००० शेतकरी खातेदारांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले. अवकाळी पावसाने आंबा बागांमध्ये कच्च्या आंब्यांचा सडा पाडल्याने या कैऱ्या लोणचे उत्पादक कंपन्यांना अल्पदरात विकण्याखेरिज आंबा बागायतदारांना गत्यंतर नसल्याचे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. राज्य सरकार सरसकट आंबा लागवडीवर नुकसान भरपाई देईल काय, असा सवालही कोंढवी येथील आंबा उत्पादक शेतकरी बाळाराम मोरे यांनी शासनाला केला आहे.

### घाटकोपर दुर्घटना मृतांचा आकडा १४ वर

घाटकोपरच्या समता कॉलनीतील पेट्रोल पंपावर भलमोठं होर्डिंग कोसळलं. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली. तात्काळ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, अग्निशमन दल आणि पोलिसांची पथके तात्काळ मदत देण्यासाठी घटनास्थळी रवाना झाली. मदत आणि बचाव कार्यादरम्यान क्रेन आणि गॅस कटरचा वापर करण्यात आला. या अपघातात अनेक आतापर्यंत १४ जणांचा मृत्यू झाला असून, ४३ जण जखमी आहेत. दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारीच परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची जाहीर केली आहे. जखमींच्या उपचाराचा खर्च राज्य सरकार उचलणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

### निवडणूक लांबणीवर

जाहीर केले जाणार आहे. या निवडणुका पुढे ढकलाव्यात यासाठी अनेक शिक्षक संघटनांनी मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले आहे.

राज्यात शिक्षण विभागाने २ मे ते १४ जून अशी सुट्टी जाहीर केली आहे. सर्व शिक्षक आणि कर्मचारी सुट्टीसाठी गावी गेले असल्याने ते ११ जूननंतर परत येतील. राज्यातील शाळा १५ जूननंतर सुरू होणार असल्याने शिक्षक आणि अन्य कर्मचारी मतदानापासून वंचित राहू शकतील, असे संघटनेचे म्हणणे होते. तसेच दि. १७ ते २० जूनपर्यंत बकरी ईदनिमित्त उर्दू माध्यमांच्या शाळांना सुट्टी असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षकांचा मताधिकार सुरक्षित केल्याबद्दल सुभाष किसन मोरे यांचे आमदार कपिल पाटील आणि शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे यांनी अभिनंदन केले.

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. ब्लेज डिसुजा व श्रीमती जेनेट रिचर्ड डीसोजा याच्याकडून कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे कडाव, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १००/४/ड एकुण १८१० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक : १५/०५/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे खारसापोली, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक नरेश महादेव पाटील यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हेनं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| खारसापोली | ७६/२/ब | ०.४०.५० पो.ख. ०.००.०० एकूण क्षेत्र ०.४०.५० | ११.६६ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणिकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-

ठिकाण : पेण
दि.१५/०५/२०२४

**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग, ब्लॉक नं. ००२
प्रभु आळी, पेण

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती. शैला नंदलाल परळकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | ग.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मापगाव | ३३ | ०-५५-५० पो.ख. ०-०८-७० एकुण ०- ६४-२० | १४.३४ |

वर वर्णन केलेल्या एकुण मिळकती पैकी ००-५२-६ हे. आर इतके क्षेत्र सदर जाहिर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा अन्य कसलाही हितसंबंध असल्यास वा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधाचे सर्व लेखी कागदोपत्र व तोंडी पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

सही/-

**ॲड. सौ. कांचन प्र. नार्वेकर**
जिल्हा न्यायालय रायगड
ता. अलिबाग, जि. रायगड

## महाराष्ट्र शासन
## (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)
## मार्ग प्रकल्प विभाग, महाड
## जिल्हा रायगड ४०२३०१

Email :- mahad.ee@mahapwd.com ph. No. 20145 222243

**NOTICE INVITING e-TENDER**

**Notice No. 01 for 2024-25**

कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक). मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड, पिन ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या कंत्राटदारांकडून बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड रायगड किल्ला सेल, मार्ग प्रकल्प विभाग महाड यांनी राखून ठेवला आहे.

| ई-निविदा काम क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौजे रायगड व किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करणे करिता मंडप व्यवस्था उभारणे व इतर अनुषंगिक महत्त्वाची कामे करणे, ता. महाड, जि. रायगड | ९९३२२०३/- | १०००००/- | १५ दिवस | ११८०/- | वर्ग ४ व वरील |
| २ | किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करिता भांडार कक्ष उभारणे, ता. महाड, जि. रायगड | ५१३४७३४/- | ५२०००/- | १५ दिवस | ११८०/- | वर्ग ५ व वरील |
| ३ | किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करणे करिता आवश्यक साहित्य खरेदी करणे, ता. महाड, जि. रायगड | ३०७३२००/- | ३१०००/- | १५ दिवस | ५९०/- | वर्ग ५ व वरील |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ निविदा सादर करण्याचा दिनांक व वे | दि. १५/०५/२०२४ (सकाळी १०.०० पासून) ते दि. २२/०५/२०२४ (१८.००) वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | मा. कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, महाड यांचे कार्यालयात दि. २४/०५/२०२४ वेळ १८.०० पासून |

टिप :- परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

रा.कि. सेल/माप्रवि/महाड/निविदा/२३६
दिनांक : १४.०५.२०२४

सही/-
**(महेश रा. नामदे)**
कार्यकारी अभियंता
(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)
मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड

# माणगावातील तीन गावांना टँकरने पाणी

## जलजीवनच्या अपूर्ण कामाचा फटका, २४ गावे ३२ वाड्या पाणीटंचाई

**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगाव तालुक्यातील काही गावांना भीषण पाणीटंचाईचे चटके बसू लागल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. तालुक्यातील तीन गावांना शासनांनी टँकरने पाणीपुरवठा सुरु केला असून मे अखेरपर्यंत आणखीन काही गावांची वाढ होवून त्यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू करावा लागणार आहे. शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत तालुक्यात अनेक गावांना पाणीपुरवठा योजना मंजूर केल्या आहेत. मात्र या योजनेतील किती कामे पूर्ण झाली हा संशोधनाचा विषय ठरला असून दरवर्षी प्रमाणे यंदाचे वर्षीही मार्च महिन्यापासून माणगाव तालुक्यातील गावांना कमी जास्त प्रमाणात पाण्याचा प्रश्न भेडसावू लागला आहे.



शासनाच्या पाणी टंचाई आराखड्यातून ही गावे वर्षानुवर्ष येत असून ही गावे पाणी टंचाई आराखड्यातून मुक्त कधी होणार हा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे. माणगाव तालुक्यातील यंदाच्या वर्षी २४ गावे व ३२ वाड्यातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे माणगाव तालुक्यातील पाणीटंचाईची साडेसाती नागरिकांच्या नशिबी कायमच राहिली आहे.

यंदा मार्च महिन्यापासूनच काही गावातील नागरिकांची पाण्यासाठी पायपीट सुरू झाली आहे. दिवसेंदिवस उष्णता वाढू लागल्याने भूगर्भातील पाण्याची पातळी खालावू लागल्याने माणगाव तालुक्यातील काही गावातील पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनत चालला आहे. शासन या गावातील पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी ठोस उपाययोजना करीत नाही.

मार्च महिन्यापासून माणगाव तालुक्यातील २४ गावे व ३२ वाड्यातील नागरिकांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असले तरी तालुक्यातील अनेक गावांना पाणी टंचाईशी सामना यापुढील काळात करावा लागणार आहे. हे वास्तव आहे.

माणगाव तालुक्यातील राजिवली, टीटवे, वडाचा कोंड, जांभूळमाळ, बोरमाच, केळगण, जोर, हरवंडी, उमरोली, बाम नगाव, चाच, मांजुर्णे, माकटी, रुद्रवली, पोटणेर, नगरोली, तळेगाव तर्फे गोरेगाव, उसर बुद्रुक, उसरकोंड, पळसप, मूळगाव, हेदमलई, पळसगाव खुर्द, हरवंडी, साई कोंड ही २४ गावे तर हुंबरी धनगरवाडी, कुंभेवाडी, आंब्रेवाडी, उमरोली बौध्दवाडी, येरद आदिवासीवाडी, नीळज आदिवासीवाडी, मोरेवाडी, मशीद्वाडी बौध्दवाडी, कातळवाडी, उधळेकोंड, सोनारवाडी, मळ्याचीवाडी, मशीद्वाडी, शिरसाड बौध्दवाडी, शिलीम बौध्दवाडी, चांदे आदिवासीवाडी, कुंभार्ते आदिवासीवाडी, गौळवाडी, कुंभारवाडी, मोकाशीवाडी, तोंडलेकर वाडी, कातेवाडी, पळसगाव खुर्द आदिवासीवाडी, खारबाचीवाडी, पळसगाव खुर्द धनगरवाडी, उसरबुद्रुक बौध्दवाडी, पानसई आदिवासीवाडी, खर्डी आदिवासी वाडी या ३२ वाड्यांचा समावेश आहे. माणगाव तालुक्यात १४७ गावात जलजीवन मिशनची कामे चालू आहेत. त्यापैकी ५४ कामे पूर्ण झाली आहेत. ९३ कामे पंगतीपथावर आहेत. त्यापैकी काही कामे ५० ते ७५ टक्के झाली आहेत.

शासनाच्या पाणी टंचाई आराखड्यात या गावांचा समावेश वर्षानुवर्षे पासून करण्यात येत आहे. मात्र कायमस्वरूपी पाणीपूरवठा योजना या गावांना का अद्याप देण्यात आल्या नाहीत. हा प्रश्न नागरिकांपुढे उभा आहे. माणगाव तालुक्यातील आंबर्ले, पळसप, वडगाव या तीन गावांना शासनाने दोन टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु केला आहे. तसेच काही वाड्यांवर रस्ता नसल्याने बैलगाडीने पाणीपुरवठा केला जातो. त्याचबरोबर या संभाव्य पाणी टंचाईग्रस्त गावे व वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी त्यांच्या मागणीनुसार शासनाकडे प्रस्ताव पाठवला जाणार आहे.

# वादळी पावसाचा बागायतीला फटका

**। रायगड । प्रतिनिधी ।**

उशिराने आलेला आंब्याची काढणी सुरू असतानाच आलेल्या वादळी पावसाने बागायतदारांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला. बदलत्या वातावरणामुळे, जिल्ह्यात काही ठिकाणी यंदा फेब्रुवारीमध्ये आंब्याला मोहर आला होता. फळधारणेनंतर वाढही जोमात होत होती, मात्र सोमवारी आलेल्या वादळा पावसाने फळ गळती झाली.

यंदा आंब्याचे उत्पादन जेमतेम ४० टक्केच झाले होते. त्यात वातावरणातील बदलाचा फटका सातत्याने बसत आहे. सुरुवातीला कडाक्याची थंडी आणि एप्रिलमध्ये उष्मालाटेमुळे फळधारणा व्यवस्थित झालीच नाही, असे येथील आंबा बागायतदारांचे म्हणणे आहे. या सर्व संकटांवर मात करून शिल्लक राहिलेली फळे वादळी पावसात गळून पडली. उशिराने फळधारणा झालेली फळे साधारण मेच्या शेवटच्या आठवड्यात काढण्यायोग्य होतील, असा अंदाज होता. रोहा, श्रीवर्धन येथील बागायतदारांच्या माहितीनुसार, झाडावर तयार होत असलेली ८० टक्के फळे खराब झाली आहेत. आता यापुढे बाजारात येणाऱ्या आंब्याची आवकही कमी होणार असल्याने त्याचा परिणाम किमतीवर होण्याची शक्यता आहे.

यापूर्वी पिकवण्यासाठी काढलेली फळे सुरक्षित आहे. ती फळे व्यवस्थित पिकवण्याकडे आता बागायतदारांचे लक्ष राहणार आहे. कर्जत, खालापूर, पेण अलिबागमध्ये पावसाने हजेरी लावली. वाऱ्यासह धुळीचे लोट वाहत होते. काही ठिकाणी गारांचा पाऊस झाला असून महसूलचे अधिकारी नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करीत आहेत.

# अखंड भक्ती रसामृत यज्ञोत्सवाची सांगता

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**



रायगड भूषण, गुरुवर्य रामदास महाराज पाटील यांच्या प्रेरणेने व हनुमंत लभडे यांच्या संकल्पनेतून, ज्ञानेश्वर महाराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीय वर्षी अखंड भक्ती रसामृत यज्ञोत्सव निमित्ताने ग्रामस्थ, या परिसरातील भाविकांच्या माध्यमातून वारद येथे अखंड ज्ञान, जप यज्ञ, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण दिपोत्सवाच्या माध्यमातून सांगता करण्यात आली. या सोहळ्यांचे तिसरे वर्ष असून रोज नित्यनेमाने काकडा, भजन, प्रवचन सामुदायिक पारायण, तसेच किर्तनांचे आयोजन करण्यात येत होते.

ग्रामस्थ, महिला मंडळ, तरुण वर्गाकडून हा यज्ञोत्सव उत्साहाने आणि भक्तीभावाने साजरा करण्यात येत होता. अनंत महाराज कार्ले, पांडुरंग महाराज पाटील, ग्रुप ग्रामपंचायत माजगांव सरपंच दिपाली पाटील, सदस्य शशिकांत पाटील, उत्तम भोईर, नरेश पाटील यांच्या हस्ते दीपोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय अशा विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती आणि वारकरी संप्रदाय येथील थोर कीर्तनकार, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी दीप प्रज्वलित करून आणि ज्ञानेश्वराच्या पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

गेले तीन दिवस अखंड, भजन, कीर्तनाच्या माध्यमातून या ठिकाणी चैतन्य निर्माण झाले.दीपोत्सव दिवशी महिला वर्गांनी हातात निरंजनाचे ताट हातात घेवून उभे असल्याचे दृश्य पहावयास मिळाले. तसेच काल्यांचे कीर्तन रायगड भूषण, गुरुवर्य रामदास महाराज पाटील महाराज यांचे झाले.

# कुलस्वामिनीचा उत्सव साजरा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नोकरी-धंद्यामुळे गावापासून दूर गेलेल्या भुवड कुटुंबियांनी रोहा तालुक्यातील गोपाळवट येथे एकत्र येत आपल्या कुलस्वामिनीचा उत्सव जल्लोषात साजरा केला. शनिवार (ता.११) रोजी साजरा झालेल्या या उत्सवानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भुवड कुटुंबियांच्या कुलस्वामिनीचे अधिष्ठान गोपाळवट येथे महादेव भुवड यांच्याकडे आहे.

या ठिकाणी गोपाळवट पंचक्रोशीतील वावडुंगी, महालोर, साठलेवाडी, मुचणे, हार्डी येथील भुवड कुटुंबियांनी एकत्र येत कुलस्वामिनीला अभिषेक घातला, त्यानंतर सत्यनारायणाची महापुजी घालण्यात आली होती. सायंकाळी खारआंबोली व मुरुड पंचक्रोशी यांचा हरिपाठ आयोजित करण्यात आला होता. या हरिपाठात भुवड कुटुंबातील महिला, पुरुषांनी उत्साहात सहभाग घेतला. रात्री रोहा तालुक्यातील खांब- तळवली येथील मारुती महाराज कोल्हटकर यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. नोकरी धंद्या निमित्ताने गावापासून दूर गेल्याने नवी पिढी नाती-गोती विसरत चालली आहेत, अशा परिस्थितीत भुवड कुटुंबियांनी एकत्र येत आपला कौटुंबिक सलोखा अधिक दृढ व्हावा, यासाठी सुरु ठेवलेला रिवाज कौतुकाचा विषय ठरत आहे. या उत्सवात गोपाळवट गावातील दुसार, केंबळे, इंगळे, पवार, दोडेकर, पोर्णेकर, पानगले, सोलम, उदेग, घाणेकर, घेवडे, किंजले, मोरे या परिवारानेही सहभाग घेतला.

# माजी विद्यार्थ्यांचा आनंद मेळावा

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**



मुरुड जंजिरा येथील सुप्रसिद्ध सर एस् ए हायस्कुलच्या मार्च १९६५ च्या ११वीच्या विद्यार्थ्यांचे ९ वे स्नेहसंमेलन हॉटेल मुरुड प्लाझामध्ये साजरे झाले.

२०१५ साली एस्.एस्.सी. परिक्षा देऊन ५० वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्त १० मे २०१५ रोजी प्रथम संमेलन भरवण्यात आले. त्याला मिळालेला प्रतिसाद बघून ते दरवर्षी घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे २०१९ पर्यंत ते सलग भरवले गेले. २०२० मधे कोरोनामुळे होऊ शकले नाही. त्या काळात काही सदस्य हे जग सोडून गेले. तसेच सर्वांनी वयाची सत्तरी पार केली होती. तेव्हा २०२१ पासून सहकुटूंब संमेलनाला यावे असे ठरले. त्याप्रमाणे सदस्य नातवंडासह सहभागी होतात.

सुरूवातीला गतवर्षात निधन पावलेल्या श्रीकांत पत्की, अशोक उपाध्ये व आत्माराम भोईर यांना तसेच वर्गमित्र प्रमोद भायदे (अलिबाग) याच्या पत्नी दिपाली यांचे निधन झाले त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

योगायोगाने त्याच दिवशी वर्गमित्र रामचंद्र मेस्त्री याच्या पत्नी नंदा यांचा वाढदिवस होता. त्याना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. शालेय जीवनातील गमती जमती, शिक्षकांविषयींच्या आठवणीना सुखद उजाळा देत कार्यक्रम संपन्न झाला.

दुसऱ्या दिवशी मतपेट्या वाहतुकीसाठी एसटी जाणार असल्याने बाहेरुन आलेल्यांच्या परत प्रवासाची गैरसोय होऊ नये म्हणून कार्यक्रम पुढील वर्षी भेटण्याच्या उत्साहपूर्ण घोषणा देऊन दुपारच्या भोजनानंतर आटोपता घेतला.

# सुवर्णा जाधव यांना पुरस्कार



**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा रुपेश जाधव यांना आविष्कार फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य, कोल्हापूर इंडिया या सेवाभावी संस्थेतर्फे राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्काराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, पन्हाळगड या ठिकाणी झालेल्या भव्य दिव्य अशा कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे न्यूरोसर्जन डॉ. संतोष प्रभू यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

आविष्कार फाऊंडेशन ही संस्था सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य, सांस्कृतिक क्षेत्रात गेली १८ वर्षे कार्यरत आहे. या फाऊंडेशनतर्फे समाजात वेगवेळ्या क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा जिल्हा व राज्य स्तरावर पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते यथोचित गौरव करण्यात येतो. या पुरस्कार सोहळ्याला फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष पत्रकार संजय पवार, राज्य पुरस्कार निवड समिती सदस्य माधुरी सावंत, फाउंडेशनचे रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष किशोर मोहिते आदी मान्यवरांसह राज्यभरातून पुरस्कारती व नागरिक बंधू - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी यंत्रणांचा समन्वय आवश्यक

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता मान्सून काळात येणाऱ्या पाऊस, पूर, वीज तसेच अन्य आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. आपत्ती काळात तात्काळ संपर्क करून आपण अल्पावधित कार्यवाही करू शकतो. त्यासाठी सर्व यंत्रणांनी दक्ष व सज्ज रहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय मान्सून पूर्व तयारी आढावा बैठक २०२४चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, यासह विविध शासकीय विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, सर्व शासकीय यंत्रणांनी अतिधोकादायक व धोक्याची संभावना असलेल्या ठिकाणांची पाहणी करावी.या ठिकाणच्या नागरिकांना मान्सून कालावधीमध्ये सुरक्षित जागी स्थलांतरीत करता यावे यासाठी निवाऱ्याची सज्जता करावी. तसेच या काळात उपविभागीय अधिकारी व पोलीस अधिकारी, तहसीलदार यांनी उत्तम समन्वय राखत काम करावे. नगरपालिका महानगरपालिकांनी नालेसफाईची कामे २५ मे पूर्वी पूर्ण करावीत.

आपत्तीच्या प्रसंगी रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग आदी विभागांनी देखील नागरिकांच्या मदत व सुरक्षेच्या दृष्टीने पूर्वतयारी करावी.

### जिल्हाधिकारी यांचे निर्देश

रस्त्यावरील खडे, साईडपट्टी भरुन घेणे, रस्त्यावरील ब्लिंकर्स, बोर्ड, डायव्हर्शनचे बोर्ड, बॉल्क स्पॉटवर रिफ्लेक्टर्स बसवावेत. सर्व विभागांकडील शोध व बचाव साहित्यांची दुरुस्ती करून सर्व साहित्य सुस्थितीत राहील, याची दक्षता घ्यावी. आवश्यक शोध व बचाव पथक, रुग्णवाहिका, स्थलांतराचे ठिकाण, अन्न पाण्याची व्यवस्था, जेसीबी मशिन्स, वूड कटर्स, बोट, लाईफ जॅकेट, स्पीड बोट, जनरेटरसह इ. साहित्य व मनुष्यबळ सर्व विभागांनी सज्ज ठेवावेत. पूर परिस्थितीमुळे रोगराई पसरुन साथरोगाचा धोका असणाऱ्या ठिकाणी फवारणी करावी. औषधांचा साठा ठेवावा असे जिल्हाधिकारी जावळे यांनी सूचित केले.

## जान्हवीचे यश

**माथेरान :** माथेरानच्या जान्हवी सुरेश शिंदे हिने सीबीएसईच्या दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले. जान्हवीने ९४.९६ टक्के गुण प्राप्त केले असून जान्हवी सुरेश शिंदे हिने परेल येथील सोशल सर्व्हिस लीग या शाळेतून मार्चमध्ये दिल्लीच्या सीबीएसई बोर्डाची परीक्षा दिली होती.



## दिव्याचे यश

**मुरूड :** मुरूड जंजिरा शहरातील रहिवासी दिव्या दीपक पालशेतकर हिने १०वी सीबीएसई परीक्षेत ९३.२० गुण संपादन करून सुयश मिळविले आहे.दिव्या, ही मुरूड तालुक्यातील साळाव येथील जिंदाल विद्या मंदिर इंग्रजी माध्यम शाळेची विद्यार्थीनी आहे.



# सहाणला युवती चेतना शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र कोकण प्रांत कुलाबा जिल्हा यांच्या माध्यमातून जन शिक्षण संस्थान रायगड मुख्य कार्यालय सहाण अलिबाग या ठिकाणी युवती चेतना शिबीर उपक्रम राबविण्यात आला.

याच उपक्रमाचा भाग म्हणून जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून उपस्थित २०० वनवासी बंधू-भगिनींना विधी साक्षरता व वारली चित्रकला मार्गदर्शन देखील करण्यात आले.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया यांच्या मुख्य उपस्थितीत वनवासी बंधू-भगिनींना महिला सक्षमीकरण प्रेरणादायी कौशल्य विकास मार्गदर्शन करण्यात आले, तर जन शिक्षण संस्थान रायगड चे संचालक डॉ. विजय कोकणे यांनी उपस्थितांना वारली चित्रकला विषयावर मार्गदर्शन केले.

बोर्ड मेंबर ॲड. निला तुळपुळे यांनी वाटेवरती काचा ग या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच सहसचिव अलिबाग तालुका ॲड. स्वाती कुलकर्णी यांनी जनजाती समाजातील स्वातंत्र्य रणरागिणी या विषयावर मार्गदर्शन केले व रुरल अँड यंग फाउंडेशन, संस्थापक अध्यक्ष, सोशल वर्कर, सिव्हील हॉस्पिटल, अलिबाग सुशील साईकर यांनी जनजाती समाजासाठीच्या सोयी सवलती या विषयावर मार्गदर्शन केले.

तसेच प्रणिता मगर व ॲड. मनिषा नागावकर यांनी विद्यार्थ्यांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या माध्यमातून कायदेशीर नियमांचे मार्गदर्शन केले, तसेच प्रास्ताविक कुलाबा जिल्हा सहसचिव लतिका दातार, तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. पल्लवी तुळपुळे यांनी केले व पाहुण्यांचा परिचय व स्वागत हितरक्षा समिती अलिबाग तालुका ॲड. रोशनी ठाकूर यांनी केले, तर आभार प्रदर्शन व समारोप कोकण प्रांत महिला आयाम प्रमुख ज्योती पाटील यांनी केले.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. १. वेटर २. रिसेप्शन ३. हॉटेल मॅनेजर २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३.
- Fresh graduates required for office work. For interview call. ९९२३७५०५४९
- सुरभी स्वयंसेवी संस्था अलिबाग ऑफिस कामासाठी मुले/मुली/महिला पाहिजेत. शिक्षण BA, B.Com, Bsc, msw MBA सिविल हॉस्पिटल अलिबागमध्ये स्वच्छता दूत कामासाठी महिला/पुरूष पाहिजेत. संपर्क : ९४२०६४५५७९/९५२७०४०७५० पत्ता : सुरभी स्वयंसेवी संस्था, कलेक्टर ऑफिस समोर अलिबाग
- रायवाडी कॉम्प्लेक्स अलिबाग शहरामध्ये असलेल्या स्टार हेल्थ इन्शुरन्स ऑफिसमध्ये स्टाफ आवश्यक आहे. कम्प्युटरचे ज्ञान अत्यावश्यक, शक्यतो पदवीधर असावा. दोन उमेदवार आवश्यक आहेत. स्त्री-पुरूष कोणीही चालतील, अनुभव असेल तर उत्तम. ९८२२९३८४४४ या नंबरवर रिझ्युम सेंड करावा. त्याप्रमाणे आपल्याला संपर्क करण्यात येईल.
- पिंपळभाट, अलिबाग येथे मेडिकल एजन्सीजमध्ये कामासाठी मुले पाहिजेत. शिक्षण- १० ते १२ किमान व अलिबागच्या आजूबाजू परिसरातील हव्यात. ९६२३३६६७७८
- पिंपळभाट अलिबाग येथे मेडिकल एजन्सीजमध्ये सेल्समन म्हणून मुले पाहिजेत. (शिक्षण १० ते १२ किमान) (वय २०-३० पर्यंत) ९६२३३६६७७८
- Shop near Alibag ST Stand is for sale 9764548679

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रायगडात तब्बल २२ दिवस धोक्याचे

**। रायगड । प्रतिनिधी ।**

यंदाच्या पावसाळ्यात तब्बल २२ दिवस समुद्रात उधाण येणार असल्याने रायगड जिल्ह्यातील ११४ गावांमध्ये साडेचार मीटरपेक्षाही उंच लाटांचा सामना करावा लागणार आहे. २० सप्टेंबरला सर्वांत मोठी भरती समुद्र किनाऱ्यावरील नागरिकांना अनुभवता येणार आहे. भरतीमुळे नदीचे पाणी ओसरत नसल्याने खाडी व नदीकाठच्या गावांत पूरस्थिती निर्माण होत असल्याने या गावातील नागरिकांना याकाळात सतर्क राहावे लागणार आहे.

पावसाळ्यात जिल्ह्यातील ग्रामस्थ दरड, पूर व उधाणाची भरतीच्या दहशतीखाली वावरत असतात. रायगडमधील अनेक गावे समुद्र व खाडीकिनारी असून २४० किलोमीटरचा विस्तीर्ण किनारा लाभला आहे. हा किनारा जिल्ह्यातील निसर्ग सौंदर्यात भर टाकत असला तरी मोठ्या भरतीच्या वेळी हेच किनारे धोकादायक ठरतात. पावसाळ्यात मोठ्या लाटांचे पाणी अनेकदा गावात व शेतात शिरून नुकसान होते. २००५ मध्ये २५ व २६ जुलैला जिल्ह्याला पूरस्थितीचा सामना करावा लागला होता. पुरामुळे व दरड कोसळून महाड तालुक्यात १९२ जणांचा मृत्यू झाला होता. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, यंदा पावसाळ्यात एकूण २२ दिवस मोठी भरती येणार असून किमान साडेचार मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे किनाऱ्यावरील गावांना सतर्क राहावे लागणार आहे. जिल्ह्यात समुद्र किनारी ५५ तर खाडीकिनारी ५९ गावे आहेत. यात श्रीवर्धन तालुक्यातील १९, अलिबागमधील १६, पनवेलमध्ये ११, मुरूड तालुक्यातील नऊ, उरणमधील चार गावांचा समावेश आहे तर खाडीकिनारी असलेल्या पेण तालुक्यातील नऊ, अलिबाग ११, उरण पाच, श्रीवर्धन ११, माणगाव दोन, महाड सहा व म्हसळ्यातील ११ गावांना उधाणाचा धोका आहेत. उधाण भरती व अतिवृष्टी एकाच वेळी झाल्यास सखल भागातील गावांत पूरसदृश सथिती निर्माण होण्याची शक्यता असते. भरतीमुळे पाणी ओसरत नसल्याने नदीकाठच्या महाड, नागोठणे, रोहा या गावात पूरस्थिती निर्माण होते. मेरिटाईम बोर्डाकडून किनाऱ्यावरील गावांना उधाणाच्या भरतीबाबत कळवले जाते तसेच गावांना कळवून खबरदारी घेतली जाते.



- **समुद्राच्या उधाणाचा ११४ गावांना धोका**
- **नागरिकांना रहावे लागणार सतर्क**

### उंच लाटांची शक्यता

- जून : ४, ५, ६, ७, ८, २३, २४
- जुलै : २२, २३, २४,२५
- ऑगस्ट : १९, २०, २१, २२, २३
- सप्टेंबर : १७ ते २२

### आराखडे तयार करण्याचे निर्देश

यंदा पावसाळ्यातील जूनमध्ये सात दिवस, जुलैमध्ये चार, ऑगस्टमध्ये पाच तर सप्टेंबरमध्ये सहा दिवस उधाणाची शक्यता आहे. या दिवशी साडेचार मीटरपेक्षा अधिक उंचीच्या लाटा आणि मोठी भरती येण्याचा शक्यतेच्या पार्श्वभूमीवर समुद्र,खाडी तसेच नदी किनाऱ्यावरील गावांना स्थानिक पातळीवर आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पूरग्रस्त गावांना धोका मोठ्या भरतीच्या काळात उधाणांचे पाणी किनारपट्टीवरील भागात शिरण्याची शक्यता असते. समुद्र खवळलेला असतो. त्यामुळे शेतात खारेपाणी शिरून जमीन नापीक होऊ शकते. सखल भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. याच कालावधीत अतिवृष्टी झाल्यास पाण्याचा निचरा लवकर होत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील पूरग्रस्त गावांना धोका निर्माण होऊ शकतो.

# ऐनघर येथे शिबिराचे आयोजन

**सुकेळी :** नागोठणे जवळच असलेल्या ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील जिंदल समुहाअंतर्गत सुरु असलेल्या बी.सी. जिंदल रुग्णालयाच्यावतीने मधुमेह तपासणी व शरीरातील रक्ताचे प्रमाण तपासणी या दोन शिबिरांचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकुण ५९ नागरीकांनी लाभ घेतला. जिंदल रुग्णालयाचे प्रमुख वैद्यकीय अधिकारी डॉ. गोपाल परमार यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :- ४९/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. हाफिझा हुसेन बंदरकर
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. हाफिझा याकुब चिलवान — अर्जदार
लग्नानंतरचे नाव
वय ६६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा. मु. पो. मोर्बा,
ता. माणगाव जि. रायगड
विरुध्द
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगाव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. हाफीझा हुसेन बंदरकर -पूर्वाश्रमीचे नाव, श्रीम. हाफीझा याकुब चिलवान-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड दि. ०९/०४/१९५८ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. ०८/०२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०९/०४/१९५८ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. हाफीझा हुसेन बंदरकर - पूर्वाश्रमीचे नाव, श्रीम. हाफीझा याकुब चिलवान-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०९/०४/१९५८ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव
ता. १८/०४/२०२४

सही /-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :- ६४/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. नुरजहान याकुब बंदरकर
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. नुरजहान अब्दुल कादीर किरकिरे
लग्नानंतरचे नाव
वयः ५९ वर्षे, धंदा : शेती.
रा. मु. पो. मोर्बा, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड.
विरुद्ध
१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., — सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. नुरजहान याकुब बंदरकर- लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. नुरजहान अब्दुल कादीर किरकिरे लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०२/०१/१९६५ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. १४/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०२/०१/१९६५ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. नुरजहान याकुब बंदरकर लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. नुरजहान अब्दुल कादीर किरकिरे लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०२/०१/१९६५ रोजी राहत्या घरी झाला, असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव
ता. १३/०५/२०२४

सही /-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. : ६१/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. मोहम्मद हनीफ इब्राहिम राऊत
वय ५६ वर्षे, धंदा : शेती.
रा. मु.पो. मोर्बा, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड
विरूध्द
१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., — सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. मोहम्मद हनीफ इब्राहिम राऊत यांची पत्नी श्रीम. बिल्किस बेगम अब्दुल्ला उतारकर- लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. बिल्किस बेगम मोहम्मद हनीफ राऊत - लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्चा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. १९/०७/१९६८ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. १५/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांच्या पत्नीचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. १९/०७/१९६८ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. मोहम्मद हनीफ इब्राहिम राऊत यांची पत्नी श्रीम. बिल्किस बेगम अब्दुल्ला उतारकर - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. बिल्किस बेगम मोहम्मद हनीफ राऊत-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. १९/०७/१९६८ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव
ता. १३/०५/२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. : ६५/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. हनीफा सुलैमान राऊत
वयः ५५ वर्षे, धंदा : शेती.
रा. मु. पो. मोर्बा, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड.
विरुध्द
१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

